

श्री गुं.कृ. संगोराम
१३ मार्च १९३०

सौ. सुनंदा संगोराम
२२ जुलै १९३६

## भावानुवादकाराचा परिचय

श्री प्रसन्नवेंकटदासांच्या कृतीचे भावानुवादकर श्री गुं.कृ. संगोराम त्यांचे मूळ गांव 'मंगसुळी' बेळगांव जिल्ह्याच्या अथणी तालुक्यातील एक खेडे. श्री संगोरामाचे घराणे एक प्रतिष्टित घराणे. वंशपरांपरगत तेथील मराठा सरदार श्री पवार देसाई यांच्या कडे कारभारी-दिवाणजी या नात्यानी काम करत होते. ही परंपरा सुमारे २००-२५० वर्षाची जुनी आणि ही परंपरा १९५० पर्यंत अस्तित्वात होती. मंगसुळी गांव अगदी महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमेवर आहे. तेथे मराठी शाळा असल्याने श्री संगोराम शिक्षण मराठीत झालेले होते. पुढचे शिक्षण मिरजेला झाले, ते पण मराठी माध्यमातून श्री गुं.कृ. संगोरामाच्या पत्नी कुं.सौ. सुनंदाबाई यान्ही अथणी तालुक्यातला दुसऱ्या एक खेड्यांच्या. त्या खेड्यांचे नांव 'नंदेश्वर' पण त्यांचे वडिल कोल्हापूर संस्थानांत नोकरीला होते. त्यामुळे बालपण, विवाहापर्यंतचा काळ कोल्हापूरांतच गेला. सौ. सुनंदाबाईचे शिक्षण सुद्धा मराठीतून झाल्यामुळे, श्री गुं.कृ. संगोरामाच्या अश्या कार्यात पत्नी कडून सहकार्य मिळते. ह्या जोड्यांचा संसार म्हणजे सहनशीलता आणि समाधानाने भरलेला. यांचा अर्थ असा नांही कीं यांना जीवनांत कांहींच अडीअडचणी - त्रास भोगावे लागली नांहीत. भरपूर अडिअचणी आल्या आणि त्रास सोसावे लागले. आंताही त्यांना अनेक व्यथा आहेत. त्यांतच हे कुटुंब सुख समाधान घेते. या विषयांत श्री प्रसन्नवेंकट दासानी रचलेले एक भजन (कृ.सं.)पाहिले तर, त्यांच्या सुखी - समाधानी जीवनांचा अर्थ होतो. श्री प्रसन्न वेंकटदास या भजनांत सांगतात कीं

**''असे असेल तर किती किती छान । लाभेल जीवनी सुख समाधान ।।**
**असावी प्रिय सखी सति सहचारी । पतीस द्यावे साथ धर्माचरणी ।।''**

श्री गुं.कृ. संगोराम, माध्यमीक शिक्षणा नंतर मुंबई सेक्रेटरीएट मध्ये नोकरी मिळाली. १९५६ मध्ये ते बेंगळोरला आले, कर्नाटक सरकाराच्या सेवेतून अधिन कार्यदर्शी म्हणून निवृत झाले. आता निवृत होऊन २५ वर्षेझाली. त्यांना संत साहित्यात दास वाङ्मयांत फार गोडी आहे. त्यांनी श्री महिपत दास, कृष्णदास यांच्या सुमारे १०० वर कीर्तने मराठीत भावानुवाद करून ''भक्ति साधना'' नांवाचे एक पुस्तके सुमारे ७ वर्ष्यापूर्वी प्रसिद्ध केले, आंताची ही दुसरी भावानुवाद कृती. कृपया, कोणी असे समजू नये कीं श्री संगोरामानी संत साहित्य आणि दास साहित्यांताच गाढ अभ्यास केला आहे, त्यांना अभिरुचि यां विषयांत एवढेच.



श्री प्रसन्नवेंकटदासांच्या कीर्तनांचा इतर भारतीय
भाषेतील भावानुवाद पुष्प गुच्छ-१-मराठी

# श्री प्रसन्नवेंकटदासांची निवडक कीर्तने

(मूळ कन्नड कीर्तनांचा मराठी भावानुवाद)

*भावानुवादकार*

**श्री गुंडोपंत कृष्णाजी संगोराम**

**श्री प्रसन्नवेंकट प्रकाशन**
१५ मंत्रालय (प्रशांतीनगर)
९वी 'बी' मुख्य रस्ता, १७-क्रॉस
इसरो लेऔट, बेंगलोर-५६००७८
दूरवाणी ०८०-२६६६ ५३९८, मोब. ९४४८०११९५४
Email: trust@prasannavenkatadasaru.org
rsk9651@yahoo.com
Website: www.prasannavenkatadasaru.org

SHRI PRASANNA VENKATA DASANCHI NIVADAKA KIRTANE

Moola kannada kirtanancha marathi Bhavanuvad (Sri Prasanna venkatadasanchya kirtanancha itara Bharatiya bhashetil Bhavanuvad Pushpa Guccha-1 Marathi)

Written By: Shri Gundopant Krishnajee Sangoram, No.240, 3rd Main, 5th Cross, Ideal Home Society Township, Rajarajeshwari Nagar, Bangalore-560 098, Phone : 080-28607281.

Published By: Sri Prasanna Venkata Publications No. 15, "Mantralaya" Prashantinagar 9th "B" Main Road, 17th Cross, ISRO layout Bangalore-560078

First Print : 2012

Copyright : Author

Page : 68

Price : Rs.30/-

Used Paper : 70 GSM Maplitho

Copies available at :

1. **Mrs. Rekha Kakhandaki**
   No 15, Mantralaya, Prashantinagar
   9th "B" Main Road, 17th Cross
   ISRO layout, Bangalore-560078
   Phone : 080-26665398. Mob : 09448011954
   E-mail : rsk9651@yahoo.com/subhasbk@gmail.com
   trust@prasannavenkatadasaru.org

2. **Shri Dhruvacharya Kakhandaki**
   No35, "C" Block, sector-3, Bagalkot. Ph. 08354-235955

3. **Shri V.M.Kulkarni**
   Kolhapur (Maharastra), Ph.: 9421100174

4. Mrs.Lata Naganur
   Mumbai, Ph.: 8097301448

Printers : Vagartha, 149, 8th cross, N.R. Colony, Bangalore-19. vagartha@yahoo.com



# समर्पण

प्रसन्न चरित्र प्रसन्न शोभायमान वक्त्र ।
प्रसन्न विशाल नेत्र प्रसन्न अद्भुत गात्र ।।
प्रसन्न वेंकट कृष्ण जर होई प्रसन्न ।
येई प्रसन्नपूर्ण उक्ति नित्य पवित्र ।।
देई भक्तजनाना बाहूबल सर्वत्र ।। १ ।।



श्री प्रसन्न वेंकटदास जीवनकाल (इ.स.१६८० ते १७५२)

श्री प्रसन्न वेंकटदासाच्या हृदय निवासी श्री प्रसन्न वेंकटेश्वर देवांच्या दिव्य पादारविंदी हे संकलन श्रद्धाभक्तिपूर्वक समर्पण करीत आहोत.

# कर्नाटकांतील यति आणि दासांचे भक्ति मंदीर

अचलानंद दासानी केला संकल्प ।
अुभारण्याचा भक्तिमंदीर प्रकल्प ।।

पुरंदर, कनकानी खोदला पाया खोलवर
महिपति, कृष्णानी बांधला मंदीर

प्रसन्न वेंकटानी बांधला गाभार
प्रस्थापिला तेथे देव वेंकटेश्वर

विजय, गोपाल जगन्नाथानी
चढविले भव्य गोपूर सुंदर

पंच* यतीचे पाच कळसशिखर
वसविले तयांनी गोपूरावर

..............

* पंच यतीचे नावे:
(१) श्री नरहरितीर्थ
(२) श्री श्रीपादराजतीर्थ
(३) श्री व्यासराजतीर्थ
(४) श्री वादिराजतीर्थ
(५) श्री राघवेंद्रतीर्थ



# भावानुवादकाराचे दोन बोबडे बोल

सुमारे दोन एक वर्षापूर्वी माझे डाक्टर सुभाष काखंडकी यांनी कर्नाटकातील एक महाप्रसिद्ध हरिदास, श्री प्रसन्न वेंकटदासांच्या भजन संकीर्तनातील कांहीं निवडक कृतींच्या मराठीत भावानुवाद व्हावा आणि एक छोटेसे संकलन बाहेर यावे अशीकल्पना माझ्या समोर मांडली होती. त्यावेळी या विषयांत त्यांच्याशी विशेष कांहीं बोललो नव्हतो. याला कारण म्हणजे माझे वाढते वयोमान. मी त्यावेळी ८० वर्ष पार केली होती. आता नुकताच ८३ वर्षात पदार्पण केले आहे. या वयात मला काम झेपेल कां आणि पूर्ण होईल काय, अशी शंका मनात येत होती. पुढे डॉक्टरानी चाळीस भजनांचा संग्रह माझ्या पुढे ठेवला. श्री हरिदासांचे एक त्रोटक चरित्रात्मक निवेदन पण पुरविले. हे निवेदन वाचून आणि डॉक्टराची आसक्ती पाहून मला या भावानुवादाच्या कार्यात वाहवून घ्यावे असे अगदी मनापासून वाटले.

कारण, श्री प्रसन्न वेंकटदासांचे चरित्र तसे अद्भूत. त्यांच्या विषयी कांहींतरी बोलावे तर जीभ अडखळते. कांहींतरी लिहावे तर हात अडखळतात. मनांत भीति वाटते. न कळत वा कळत कांहीं चूका घडल्यातर, काय होईल असा संशय येतो. म्हणून वर शीर्षकामध्ये ''भावानुवादकाराचे दोन बोबडे बोल'' असा उल्लेख केला आहे. तसे पाहिले तर श्री प्रसन्नवेंकटदास हे एक अनपढ अज्ञानी व्यक्ति. ते एका भजनी मंडळी बरोबर तिरुपतिला जातात. तेथे जाताना त्यांचे वय फारच कोवळे. केवळ १०-१२ वर्षाचे असतील. एका तपाहूनी अधिक, म्हणजे १२ वर्षाहूनी अधिक काळ तिरुपतीतच वास्तव्य मांडतात. श्री वेंकटेश्वराच्या प्रत्यक्ष दर्शनांचा लाभ त्यांना मिळतो. साक्षात्कार घडतो. हरिदासाना आवश्यक वस्तु जसे, करताळा एकतारी (लहान तंबोरा), पायांतील घुंघूर, भिक्षेची झोळी, श्री वेंकटेश्वरांच्या तर्फे दिल्या जातात. नित्य पूजासांठी श्रीदेवि, भूदेवि समवेत श्री वेंकटेश्वरांची मूर्तिही त्याना

प्राप्त होते. यासाऱ्या घटना आश्चर्य कारकच नांहींत काय. त्यांच्या जीव्हेवर ''प्रसन्न वेंकट'' असे नामांकान सुद्धा कोरले जाते. या साऱ्या गोष्टीमुळे मी भारावून गेलो. भावानुवाद कामांचा शुभारंभ केला आणि संपविला. या विषयांत माझे असे कांही नांही, हा केवळ जीवनांतील एक नाट्यमय प्रसंग, कर्ता करविता परमात्मा श्री वेंकटेश्वर आणि त्यांची सुप्तइच्छा आणि श्री प्रसन्न वेंकटदासांचा आशिर्वाद, असेच म्हणावे लागेल.

आंता त्यांच्या कृती बद्दल सांगावयाचे तर, लहान तोंडी मोठा घास घेतल्या सारखे होईल. त्यांच्या भजन-संकीर्तनातील भाषा काही ठिकाणी ग्रामीण आहे. प्राचीन कन्नड शब्दांचा भरघोस वापर केला आहे. त्यांच्या बरोबर संस्कृत भाषा-शब्द ही उपयोगात आणीली आहेत. त्यांच्या भजन संकीर्तनाचा विचार विनीमय करताना, प्रत्येक अक्षरांचा, शब्दांचा आणि प्रत्येक पदाचा ओळीचा खोलवर विचार करावा लागतो. संदर्भ जुळवावे लागतात मग थोडा फार अर्थ होतो. या कठीण कामात मी कितपत यशस्वी झालो आहे अथवा होईन, हे दासवर्यानी आणि त्यांचे आराध्य देवत श्री वेंकटेश्वरानी ठरवावे. त्यांच्या भजन संकीर्तनात दोन कृती खरोखरीच सुंदर वाखण्यण्या जोगी आहेत. पहिले संकीर्तन ज्या दिवशी साक्षात्कार घडला. त्या दिवशी रचलेले आहे. श्री प्रसन्न वेंकटदास येथे असे म्हणतात :

''बाप्पा कसा पावलारी मजला ।
माझे दोष, अवगुण आणि पाप न पारखता ।।
निर्दोषी तूं देव सदा सर्वथा ।
तिरुमलेशात्रिगुणातीला ।। ध्रु ।।''

दुसरे संकीर्तन देहावसाना दिवशी गायलेले. ते आहे असे :

''कोण तूं रे सोनूल्या, कोण तूं रे छकुल्या ।। ध्रु ।।
कसा काय शिरलासी माझ्या घराती ।
कडी लावले दारे बंद होती ।।
कोणती इच्छा ठेवूनी मनांती ।



कसा रे आलासी माझ्या घराती ।।
सांग तूं रे चिमकुल्या ।। २ ।।''

येथे श्री दासानी, देवाशी थेट संपर्क साधला. त्यांच्याशी संभाषण केले आणि देवा कडूनच प्राण ओढवून घेतला. अत्यंत हृदयस्पर्शी घटना या कृतीत पाहण्यास मिळेल. या दोन्ही रचना संग्रहात शेवटी दिल्या आहेत. दोन्ही कृती श्री दासांच्या जीवन कथेत नमूदलेल्या आहेत.

आता माझे कर्तव्य आभार मानण्याचे. डॉक्टर सुभाष कारवंडकी यांनी मला एक सुवर्ण संधी लाभवून दिली. देव-दासांच्या कार्यात गुंतवून ठेविले. सुभाष काखंडकीची धर्म पत्नी कुं. सौ. रेखा यांनी ही मला या कामांत अनेक वेळ सहाय्य केले. तसा या दोघांचा परिचय मला ४० वर्षा हूनी अधिक वर्षाचा. मी त्या दोघाना कृतज्ञ असेन. मन: पूर्वक त्यांचे आभार मानतो. त्यांच्या विश्वस्त मंडळीनी घेतलेल्या कामांत सर्वतोपरी सुयश मिळवून द्यावे, अशी प्रार्थना, श्री वेंकटेश्वर आणि त्याचे नि:सीम दास, प्रसन्न वेंकटदासांच्या चरणी, करतो.

आणिखीन या कार्यात भरघोस मदत केली, ती श्री कट्टी यांनी. ते डॉक्टर सुभाष काखंडकीचे सहोद्योगी आणि मित्र. वय झालेल्यांचे विचार पुढे जातात आणि शब्द-अक्षर मागे पडतात. त्या मुळे कित्येक लहान मोठ्या चुकां लिखाणांत राहून जातात. अश्या चुका सुधारवून देऊन श्री कट्टी यांनी मला सहाय्य केले. माझ्या प्रमाणे श्री कट्टीचे ही शिक्षण मराठी माध्यमातून झालेले आहे. मन:पूर्वक मी कट्टीचे आभार मानतो. आणि त्यांना शुभेच्छा देतो.

शेवटी, पुन: पुन्हा श्री प्रसन्न वेंकटदासांचे आणि त्यांच्या हृदयांत निवासलेल्या त्यांच्या आराध्य दैवत श्री वेंकटेश्वरांच्या चरणी श्रद्धाभक्तिने नमस्कार करून, भावानुवादकारांचे बोबडे बोल येथेच संपवितो.

**गुं. कृ. संगोराम**
भावानुवादकार

# प्रकाशकांचे निवेदन

श्री प्रसन्नवेंकटदासांचे साहित्य आणि त्यात सामावलेले अध्यात्मिक तत्वज्ञान बहुजनसमाजापर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने 'प्रसन्नवेंकटदास सांस्कृतिक आणि धर्मादायी विश्वस्त मंडळी, बेंगळूरु' या प्रकाशन केंद्रातर्फे आणि इतर प्रकाशन केंद्राद्वारे कांही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. ही पुस्तके कन्नड भाषेतच आहेत. आमच्या संस्थेद्वारा प्रकाशित पुस्तकांची यादी इथे अन्यत्र दिलेली आहे.

श्री प्रसन्नवेंकटदासांची चरित्रात्मक माहिती आणि त्यांच्या साहित्यातील गर्भितार्थ भारतातील इतर भाषिकांनाहि परिचयाचा व्हावा या दृष्टिकोणातून या संस्थेने पाउल टाकावे असा विचार मांडला. त्यानुसार पहिले पाऊल मराठी भाषेकडे वळविले. कारण या दोनहि भाषांचा संबंध सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टया अगदी जवळचा आहे. याच कारणास्तव संत ज्ञानेश्वर, गोरा कुंभार, संत तुकाराम, सखूबाई यांच्यावरील चित्रपट कानडी भाषेत आले आणि कन्नड कलाकारांनी ते भूषविले. अगदी अलिकडच्या काळात प्रसिद्ध गायक भारतरत्न कै. भीमसेन जोशी यांनी पुण्यात राहून संतवाणी फुलविली आणि दासवाणीचा महाराष्ट्रीयांना परिचय करुन दिला. ही परंपरा त्यांच्या काही शिष्यांनी आजहि चालू ठेवली आहे. या सर्व दृष्टिकोणातून श्री प्रसन्नवेंकटदासांचे चरित्रात्मक निरूपण आणि त्यांच्या काही कृतींचे भाषा-भावानुवाद करवून घेऊन एक छोटेसे संकलन मराठीत प्रसिद्ध करण्याचे ठरविले. याच प्रयत्नांची फलश्रुति हे प्रस्तुत संकलन आहे आणि ते प्रकट करतांना आमच्या संस्थेस अतिप्रसन्न होत आहे.

भाषा-भावानुवादाचे काम आमचे श्रेष्ठ स्नेही श्री गुं.कृ. संगोराम यांच्याकडे सोपविले होते. यापूर्वीहि यांनी असलेच कार्य कर्नाटकातील दुसरे एक दासार्य काखंडकीचेच श्री महिपतीदास आणि त्यांचे पुत्रशिष्य श्री कृष्णदास यांच्या सुमारे शंभर संकीर्तनांचे भाषा-भावानुवाद करुन



'भक्तिसाधना' हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. हे आम्हास माहित होते. यास्तव त्यांना विनंती करता त्यांनी प्रेमळ भावाने स्वीकारले आणि त्वरितगतीने हे कार्य संपवून आम्हास कृतार्थ केले आहे. यास्तव आम्ही त्यांचे चिरऋणी आहोत. या कार्यात सहाय्यक म्हणून आमचे सहोद्योगी मित्र डॉक्टर राघवेंद्र आ.कट्टी यांचाहि हातभार विसरता येणार नाही. हे इस्रो सॅटेलाइट केंद्रातून निवृत्त ज्येष्ठ शास्त्रज्ञ आहेत. त्यांनी आपले वडील दिवंगत आनंदतीर्थाचार्य रामाचार्य कट्टी यांच्या स्मरणार्थ प्रायोजक म्हणून धनसहाय्य आमच्या संस्थेला दिलेले आहे. त्यांना आम्ही कृतज्ञ आहोत. श्री कट्टी आणि श्री संगोराम यांना श्री प्रसन्नवेंकटदासांचे वरदान मिळो अशी प्रार्थना दासवर्य आणि देवाचरणी करतो. या संकलनाचे प्रकटन करण्यात बेंगळूरु येथील ''वागर्थ मुद्रणालय''यांचेहि आभार मानून दिलगिरी व्यक्त करतो. या लहान संकलनाला मराठी भाषिक सद्भक्त-सज्जन भरभरुन प्रोत्साहन देतील अशी महदाशा बाळगतो.

श्री प्रसन्नवेंकट प्रकाशन आणि श्री प्रसन्नवेंकट कल्चरल
आणि चॅरिटेबल ट्रस्ट (रि) यांच्यावतीने

**डॉक्टर सुभाष काखंडकी आणि सौ. रेखा काखंडकी**
श्री प्रसन्न वेंकट सांस्कृतिक आणि
धर्मादायी विश्वस्त मंडळी आणि
प्रसन्न वेंकट प्रकाशन केंद्र, बेंगलूरु

क्रमांक १५ मंत्रालय
प्रशांती नगर, ९ (बी)
मुख्यरस्ता, इस्रो लेआऊट
बेंगलूरु-५६००७८
दूरवाणी - ०८०-२६६६५३९८

## विषय सूची


''श्री प्रसन्नवेंकट दासांचा संक्षीप्त जीवन कथा'' 11

**श्री प्रसन्नवेंकटदासांची कीर्तने**

1. विठ्ठला, विठ्ठला धर माझ्या हाता । 42
2. गमते मन देई मज रक्षण । 43
3. कर पालना, माधवा, कर करुणा 44
4. पावना वेंकटरमणा दयानिधी नारायणा 44
5. विसरू नको रे मना, माझ्या प्रीतिच्या माधवा 45
6. श्री हरिच माझा आश्रय दायक नि गति दायक 46
7. काय चूक ती माझी दिसली रे तुजला 47
8. दया कर रंगा दयाकर विठ्ठला 38
9. सतत कल्याण नित्य सुमंगल 49
10. असे असेल तर किती किती छान 50
11. वाऱ्यातला दिवा असे मनुष्य शरीर 51
12. रक्ष रे गोविंदा रक्षरे मुकुंदा 51
13. अगाध महिमा वाही श्री हरिचे अप्रतीम नाम 52
14. रमवी नयना श्री कृष्ण लीला 53
15. हत्ती आला आई महा हत्ती आला 54
16. येगे माझी आई । येगे येगे रंगूबाइ 54
17. मन ठेव निश्चल होऊं न दे चंचल 55
18. घडू दे मजला सत्संग । साधू संतांचा सुसंग 56
19. अरेमानवा ! संत राहती भवापासून दूर 56
20. दयवंत किती किती देवा 57
21. असे कोणाचे हे लबाड पोर 58
22. स्पर्शसी श्री हरि तुझ्या कराने जी पाषाण 59
23. हे मना का बाळगसी तू भय भीति 60
24. फिरत आहे कोणी वाड्या समोरी 60
25. श्री यमराज आदेशति आपुल्या दूतांना 61
26. रामा श्री रामा, सीतारामा 62
27. रंगा! आहे कां वाचले कोणी? 63
28. प्रल्हादाच्या भीति रुपी हत्तीला 64
29. योग म्हणजे काय? कशास म्हणावे योग 65
30. भूवरि धुळीत लोळले तरी काय 66
31. श्री गोपाल दासांचे श्री प्रसन्नवेंकटदासावर केलेले स्तुति कीर्तन 67




# ''श्री प्रसन्नवेंकट दासांचा संक्षीप्त जीवन कथा''

।। श्री ।।

## उपोद्घात

येथील कथानायक आहेत श्रीवेंकण्णा. पुढे ते उत्तरकर्नाटकातील एक महान हरिदास म्हणून प्रसिद्ध झाले. हे सारे घडले तिरुपतीचा देव श्री वेंकटेशाच्या कृपेने आणि त्या देवाने दिलेल्या वरदानामुळे. श्री वेंकण्णांनी नांव कमाविले ते 'प्रसन्नवेंकटदास' म्हणून. या साऱ्या गोष्टींचे विश्लेषण पुढे चरित्रात्मक निवेदनात दिले आहे. आरंभ करुया, श्री वेंकण्णांच्या श्री वेंकटेश देवावरील एका स्तुतिस्तवनाने. एका अर्थाने श्री हरिदासांच्याप्रति जेणे करुन आदरांजली ठरेल आणि हरिदास व ती त्यांचे आराध्यदैवत श्री वेंकटेश्वरहि प्रसन्न होतील, ही सद्भावना.

## ।। स्तुतिस्तवन ।।

नमो नमो नमो श्री वेंकटेशा । नमो त्रिवार नमो भूवैकुंठेशा ।। ध्रु ।।
सृष्टि निर्मापक जगदाध्यक्ष । सृष्टि नियमनी राहसी दक्ष ।।
सुजन तारणी वाहसी लक्ष । रक्षसी त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ईशा ।।
।। १ ।।

श्री रमावर मनोहर मोहक । त्रिजगतीचा पालक पोषक ।।
पूर्णेंदु सममुख आल्हाददायक । कोटी रवींचे सुतेज धारक,
सर्वेशा ।। २ ।।

सुहृदया कोमल अमल शरीर । दिव्य पितांबर शोभे तयावर ।।
नाना आभरणे अंगांगावर । विविध पुष्पांचे सुंदर हार, तयावर,
देवेशा ।। ३ ।।

स्वरुप ओंकार प्रारंभ श्रीकार । हरिनाम मंत्रबीज मूळाक्षर ।।
आकार साकार न च निराकार । सगुण परिपूर्ण तर न च
निर्गुण निराकार, जगदीशा ।। ४ ।।

अखिल ब्रह्मांडाचा मूळाधारा । श्रीरामा प्रेम कृपा सागरा ।।
सामगायन प्रिया श्री कृष्णा मुरलीधरा । कामित फलदाता
श्री वेंकटेश्वरा, देवदेवेशा ।। ५ ।।

सर्वात्मक व्यापक विस्तृत सर्वत्र । अनेक नामे विभूषित
परम पवित्र ।।
ब्रह्मादि वंदित, ऋषिमुनिजन स्तुतित । शरणागताना करिसी
सुरक्षित, प्रसन्नवेंकटेशा, परमेशा ।। ६ ।।

# ।। पूर्वपीठिका ।।

## अध्यात्म आणि तत्वज्ञान

अध्यात्म क्षेत्रात भारत एक नि:संशय महान देश. अध्यात्माचे तत्वज्ञान हे मूलत: अपौरुषेय वेदांवर व उपनिषदांवर उभे आहे. चारीही वेदांचे एकसूत्रिकरण करुन, ब्रह्मसूत्रे रचली. हे ब्रह्मसूत्रग्रंथ आणि भगवान वेदव्यासानी श्रीकृष्ण मुखांतून बाहेर पडलेली श्रीमद्‌भगवद्‌गीता अध्यात्म तत्वाज्ञानास आधारस्तंभ ठरतात. शास्त्रसंहिता आणि पुराणेहि या विषयात आपला हातभार लावतात. अतिप्राचीन काळी वेदाध्ययन, उपासना व अभ्यास ऋषिमुनींच्या गुरुकुलाद्वारे होत असे. अध्यात्मात प्रगति साधण्यासाठी जपतपानुष्ठान, योग, ध्यान, मौनाचरण या मार्गाचा उपयोग करत असत. तत्वज्ञानाचे विचारमंथन अनेक रीतिने होत असे. अशा विचारमंथनातून तीन सिद्धांत बाहेर पडले. ते म्हणजे अद्वैत, विशिष्टाद्वैत आणि द्वैतसिद्धांत. याचा अर्थ असा नाही की फार प्राचीन काळी भक्तिपंथाचा विचारच केला नव्हता. भक्तिपंथ त्यावेळी हि जरुर अस्तित्वात होता.



## बदलता काळ

ईश्वर इच्छेप्रमाणे आणि बदलत्या काळानुसार वेदाध्ययन आणि तत्वज्ञानाची उपासना यात कमतरतेची जाणीव भासू लागली. तेहि विशेषत: ख्रिस्तशकाच्या आरंभानंतर. अशा या बदलत्या परिस्थितीत तीन देवावतारी आचार्य भारताच्या पुण्यभूमीवर जन्मास आले. हे तीन आचार्य म्हणजेच श्री शंकराचार्य, श्री रामानुजाचार्य आणि श्री मध्वाचार्य. त्यांनी वेद, ब्रह्मसुत्र व उपनिषदांवर स्वत:चे विचार मांडले. या बरोबरच अद्वैत, विशिष्टाद्वैत आणि द्वैतसिद्धांतांना उजाळणी दिली गेली. श्री शंकराचार्य, श्री रामानुजाचार्य आणि श्रीमध्वाचार्य अनुक्रमे अद्वैत, विशिष्टाद्वैत आणि द्वैतसिद्धांतांचे जनक मानले जातात. हे तिघेहि अनुक्रमे रुद्र, शेष आणि वायुदेवांचे अवतार समजले जातात. अध्यात्म तत्वज्ञानाचा विषय त्यांनी या बदलत्या काळात थोडासा का होईना सोपा करुन दिला.

## भक्तिपंथ आणि परंपरा

आधीच उल्लेखल्याप्रमाणे फार प्राचीन काळातहि भक्तिपंथ अस्तित्वात होता. श्री ब्रह्मदेवांचे मानसपुत्र देवर्षि श्रीनारदमुनी हे भक्तिपरंपरेचे अध्वर्यू व जनक. केवळ 'श्रीमन्नारायण' नामस्मरणाने व अखंड संकीर्तनाने ते ब्रह्मर्षि झाले. आणि त्रिलोक संचारी बनले. नंतरच्या काळात ध्रुवकुमार आणि भक्तप्रह्लाद यांची नांवे आवर्जून स्मरावी लागतील. रामावतारी श्री सीतेची पतिवरची भक्ति आणि कृष्णावतारी श्री रुक्मिणीची श्रीकृष्णावरची प्रीतिभक्तिहि आगळ्याच प्रकारची. ह्या दोघीहि साक्षात श्री लक्ष्मीदेवीच्या स्वरुपाच्या. वायुपुत्र श्री हनुमान आणि श्री भीमसेन हे अनुक्रमे श्रीराम आणि श्री कृष्ण यांचे नि:सीम भक्त होते. अशी उदाहरणे येथे या संदर्भात देता येतील. वर उल्लखिलेल्या तीन थोर आचार्यांनीहि भक्तिमार्गाचा विचार केला होता. हे त्यांनी रचलेल्या विविध देवदेवतांच्या स्तोत्रावरुन स्पष्ट होते. श्रीमध्वाचार्यांनी तर भक्तिमार्गावर विशेष भर दिला आहे. त्यांनी असे प्रस्थापित केले की निष्काम भक्ति ज्ञानास कारणीभूत ठरते. ज्ञानाने

भक्तीची अधिक वृद्धि होते. अशी वृद्धिंगत भक्ति सद्गतीस, परमानंदास आणि मुक्तीस साधनीभूत ठरते. श्रीमध्वाचार्यांनी मांडलेले तत्वविचार, मुक्तिसाधनाप्रति भक्ति या विषयी त्यांचे मत, खाली दिलेल्या लहानश्या स्तोत्रात पहाण्यास मिळते.

## स्तोत्र

श्रीमन्मध्वमते हरिः परतरः सत्यं जगत् तत्वतो ।
भिन्ना जीवगणा हरेरनुचरा नीचोच्च भावंगतः ।।
मुक्तिर्नैज सुखानुभूति रमला भक्तिश्च तत्साधनं ।
ह्यक्षादि त्रितयं प्रणामखिलाम्नायैक वेद्यो हरिः ।।

याचा सारांश असा की श्री विष्णुसर्वोत्तमतत्व हा पंचभेद आणि तारतम्यतत्व प्रतिपादितो. मुक्तिला फक्त भक्तिसाधनेचा मार्ग दाखवितो. येथे श्रीमध्वसिद्धांताविषयी मांडणी केवळ यासाठी केली की येथील कथानायकाची या सिद्धांतावर अचल श्रद्धा होती. हरिदास होऊन त्यांनी भक्तिमार्गच अवलंबिला या अशा निवेदनांमुळे हरिदास संतृप्त होतील असा दृढ विश्वास वाटतो.

## भक्तिपंथाचा वाढता ओघ

ख्रिस्त शकाच्या आरंभानंतर पहिल्या दशकाच्या शेवटी शेवटी भक्तिपंथाचा ओघ सुरु झाला आणि हा ओघ सर्व भारतभर पसरत चालला. सामान्य जनांनी संस्कृतच्या अध्ययन-अध्यापनाकडे आपली पाठ फिरविली. तरीहि संस्कृतचे अध्ययन-अध्यापन पूर्णपणे थांबले गेले असे म्हणता येणार नाही. संस्कृत भाषेची शिकवण मर्यादित राहिली असे म्हटले तर वावगे होणार नाही. याचा परिणाम म्हणून ग्रंथ लिखाण आणि भजन-संकीर्तनांच्या रचना प्राकृत भाषेत होऊ लागल्या. रामायण, भागवतादि ग्रंथ व त्यांच्यातील कथा प्राकृत भाषेतून बाहेर पडू लागल्या.



भक्तिपंथाचा मार्ग भारतात एक दोन प्रांतातच मर्यादित राहिला नाही, तर साऱ्या देशभर पसरत होता. उत्तरभारतात तुळसीदास, सूरदास, संत कबीर सारख्या व्यक्ति जन्मल्या तर साध्वी मीराबाई राजस्थानात जन्मली. बंगालमध्ये चैतन्यप्रभू, पंजाबमधे गुरुनानक व गुजराथमधे नरसी मेहता जन्माला आले. अति दक्षिणेकडे तमिळनाडु व आंध्रात रामभक्त त्यागराज आणि वचनकार बेमन होऊन गेले. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील वस्तुस्थिती तर वेगळीच होती.

महाराष्ट्रात भक्तिपंथाचा आरंभ श्री ज्ञानेश्वरांच्या काळापासून झाला असावा. हा काळ म्हणजे इ.स. १२७५ पासून ते १२९६ पर्यंत. अवघ्या २१ वर्षाच्या काळात श्री ज्ञानेश्वरांनी प्रचंड कामगिरी केली. सारी भगवदगीताच मराठीत आणली. भजनांची रचना केली. त्यांचे वडिल बंधू व गुरु श्रीनिवृत्तिनाथ, भावंडे सोपान, मुक्ताबाई यांनीहि भजने रचली आहेत. संत गोराकुंभार नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि स्त्रीवर्गात सखूबाई, जनाबाई इत्यादींनी संतवाङ्मयाची वाढ केली. संत नामदेवांची भजने पंजाबपर्यंत पोहोचली. शीख संतांनी त्यांच्या भाषेच्या लिखाणात त्यां काही कृतींचा समावेश केला आहे. या सर्वांनी पंढरीच्या विठ्ठलास दैवत मानून भजने लिहिली आहेत. श्री रामदासांची श्री रामावर अपार भक्ति होती. श्री रामावर त्यांनी अनेक कीर्तने रचलेली आहेत.

## कर्नाटकातील भक्तिपरंपरा

कर्नाटकातील भक्तिपरंपरा थोडीशी अगोदरच सुरु झालेली आढळते. श्री अचलानंद नावाचे एक दास होऊन गेले. त्यांच्या विषयी इ.स. ८०१ असा उल्लेख सापडतो. त्यामुळे आठव्या शतकाच्या अखेरीस अथवा नवव्या शतकाच्या प्रारंभास भक्तिपरंपरेचा आरंभ झाला असावा. कर्नाटकातील भक्ति साहित्य दोन भागात विभागता येईल. पहिले दाससाहित्य आणि दुसरे शरणसाहित्य. शरणसाहित्यात मोठा वाटा आहे तो श्री बसवेश्वरांचा पण

त्यापूर्वी व त्यांच्या नंतरच्या काळातहि काही शरणसाहित्यकार होऊन गेले. शरणसाहित्यातहि भक्तिमार्गावरच विशेष भर दिलेला आहे.

दास साहित्य दोन कालखंडात आणि दासवर्गाचा दोन भागात विभाजन करता येईल. पहिला काळखंड इ.स.८०१ ते इ.स. १६०० पर्यंत आणि दुसरा इ.स. १६०० ते इ.स. १८०० च्या दरम्यान. दासवर्गाच्या दोन भागापैकी पहिला भाग असेल यतिवर्यांचा आणि दुसरा तो दासार्यांचा. पहिल्या वर्गात यतिश्रेष्ठ श्री नरहरितीर्थ, श्री श्रीपादराजतीर्थ, श्री व्यासराजतीर्थ, श्री वादिराजतीर्थ आणि नंतर कलियुगातील कल्वद्रुम म्हणून प्रसिद्ध पावलेले मंत्रालय क्षेत्राचे श्री राघवेंद्रतीर्थ यांचा उल्लेख करता येईल. या यतिश्रेष्ठांनी संस्कृतमध्ये ग्रंथ रचले तसेच दाससाहित्यातहि भरीव कामगिरी केली. दास वाङ्मयहि फुलविले. यांना दाससाहित्यातले पाच हिरे असे म्हणता येईल.

इ.स. १६०० पूर्वी जे दास होऊन गेले ते म्हणजे श्री पुरंदरदास आणि श्री कनकदास. तत्पूर्वीचे श्री अचलानंददासांचे नावहि यात घालता येईल. इ.स. १६०० नंतरच्या काळात काखंडकीचे श्रीमहिपतिदास आणि त्यांचे पुत्रशिष्य श्रीकृष्णदास. 'भक्तिसाधन' संकलनात या दोघांचे संक्षिप्त चरित्र दिलेले आहे, त्यांची संकीर्तने मराठी अनुवाद करुन 'भक्तिसाधन' मध्ये मुद्रित केलेली आहेत. श्री पुरंदरदास व कनकदासांची कीर्तने महाराष्ट्रात ऐकण्या मिळतात. पुढील हरिदास म्हणजे कथानायक श्री वेंकण्णा ऊर्फ प्रसन्नवेंकटदास. त्यांचे समकालीन श्री विजयदास, श्री गोपालदास व श्री जगन्नाथदास. हे समकालीन दासत्रय आणि श्री पुरंदरदासांनी, महाराष्ट्रातील संताप्रमाणे पंढरीच्या विठ्ठलास दैवत मानून आपली भजने व कीर्तने रचली. श्री कनकदासांनी बेलूरच्या केशवास आराध्यदैवत केले. येथील कथानायकाचे आराध्यदैवत म्हणजे तिरुपतीचा देव श्री वेंकटेश्वर, श्री अचलानंद, श्री पुरंदरदास, श्री कनकदास, श्री विजयदास, श्री गोपालदास, श्री जगन्नाथदास तसेच श्री प्रसन्न वेंकटदास या नऊ दासार्यांना दास



साहित्यातील नवरत्न म्हणून संबोधिले तर अतिशयोक्ति होणार नांही. आधीच, पाच यतिवरेण्यांना पाच हिरे म्हणून उलेखिलेले आहे. नंतरहि काही हरिदास झाले. त्यांच्या नावांची एक स्वतंत्र यादी करावी लागेल. पण त्याची आवश्यकता इथे आहे असे वाटत नाही.

## कथानायक श्री वेंकण्णा म्हणजेच श्री प्रसन्नवेंकटदास

### श्रीवेंकण्णांचे पूर्वज आणि जनक

श्रीवेंकण्णांचे पूर्वज मूळचे काखंडकीचे. काखंडकी कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील एक खेडे. सतराव्या शतकात कर्नाटकातील विजापूर प्रदेश परकीय अंमलाखाली होता. तेथे मुस्लीमांची राजवट होती. नंतरच्या काळात ब्रिटिशांचे राज्य आले. विजापूर एक जिल्हा झाला. आणि तो पूर्वीच्या मुंबईप्रांतात समाविला गेला. श्री वेंकण्णांच्या वडिलांचे नाव श्री नरसप्पय्या. आईचे नाव श्रीमती लक्ष्मीबाई होते. हे दांपत्य काखंडकीलाच रहात होते. त्यावेळच्या राजकीय परिस्थितीमुळे सामान्य जनता अतिशय त्रासलेली होती. विशेषत: वैदिक आणि पुरोहित वर्ग. श्री नरसप्पाहि याच वर्गात येत होते. वैदिक व पुरोहित वर्ग एका ठिकाणाहून दुसरीकडे स्थलांतर करीत असे. श्री नरसप्पांनीहि आपले कुटुंब काखंडकीहून बागलकोटला हलविले आणि तेथे स्थायिक झाले. बागलकोट त्यावेळी विजापूर जिल्ह्यात होता. अगदी अलिकडे कर्नाटकराज्यात बागलकोटदेखील एक जिल्हा झाला आहे. समाधानाची गोष्ट अशी की बागलकोटास त्याकाळी मराठी सरदार होता. काय करणी असते ते पहा. काखंडकीचे अगोदरचे श्रीमहिपतिदास मूळचे बागलकोटचे. विजापूरमध्ये काही वर्षे राहून काखंडकी निवासस्थान निवडले. देहावसानानंतर काखंडकीतच वृंदावनस्थ झाले. या उलट श्री नरसप्पय्या काखंडकीहून निघून बागलकोटचे रहिवासी झाले.

## जनकजननीचा बागलकोट वास

श्री नरसप्पा बागलकोटमधे आपल्या सहधर्मिणीसह रहात असत. त्यांना एकच अपत्य होते. त्यांचे नाव श्री राघवेंद्र होते. श्री नरसप्पा एक विद्वान सज्जन पुरुष होते. ते वेदशास्त्र पाठप्रवचन आणि पौराहित्य कर्मावर आपले कुटुंब चालवित होते. त्यावेळी बागलकोटमधे अनेक घनपंडित आणि विद्वान मंडळी होती. बागलकोट हे पंडित विद्वानांचे माहेरघर असे ओळखले जात असे . १९ आणि २० व्या शतकातहि या शहराची अशीच ख्याती होती. आज देखील थोडी फार का होईना अशी मंडळी बागलकोटमधे पहावयास मिळतात. श्री राघवेंद्रांनी आपले वेदाध्ययन आणि पौरोहित्याचे शिक्षण आपल्या वडिलांकडूनच घेतले आणि या विषयातले उच्चशिक्षण दुसऱ्या एका महाविद्वानांकडून संपादले. श्री नरसप्पांची पत्नी श्री लक्ष्मीबाई एक साध्वी स्त्री असून खरोखरच सहधर्मचारिणी होती. तिला भजने संकीर्तने येत होती. रोज ती गायाची. लहान स्तोत्रे, जी स्त्रियांनी नित्य म्हणावयाची असतात, ती म्हणायची, पुराणातील कथा-उपकथा मुलांना सांगत असे. एकंदरीत श्री नरसप्पा आपल्या पत्नी-मुलाबरोबर जीवन जगत होते.

## श्री वेंकण्णांचा जन्म आणि बालपण

आईवडिलांच्या उतारवयात श्री वेंकण्णा इ.स. १६८० मधे जन्माला आला. दोघा भावंडांमधे वयाचे महदंतर होते. वाढत्या वयामुळे श्री नरसप्पांना श्री वेंकण्णांचे कसे काय होणार हा प्रश्न धसावत होता. या विचारांमुळे श्री नरसप्पा दंपती चिंताग्रस्त असायची. पण तरीहि ते समाधानाने रहात होते. याचे कारण या दंपतीची तिरुपतीच्या श्री वेंकटेश्वरावरची अचल श्रद्धा. आईने श्री वेंकण्णांच्या मनी चांगले संस्कार घडविले होते. तिला येणारी भजने आणि संकीर्तने श्री वेंकण्णांकडून पाठ करवून घेतली होती. आईने सांगितलेल्या पौराणिक आणि लौकिक कथा



त्यांना अवगत होत्या. तो आईबरोबर पहाटे, दुपारी पूजेच्यावेळी आणि रात्री आरतीसमयी गात असत. छोटी स्तोत्रेहि म्हणत असत. गो-सेवेची महतीहि त्यांना पटवून दिली होती. श्री वेंकण्णाहि या सेवेत आनंद घेत होता. असे लहानपणी घडलेले संस्कारच त्यांला पुढे उपयुक्त ठरले. आईवडिलांनी श्री वेंकण्णांचे उपनयन त्यांच्या आठव्यावर्षी कसेबसे उरकून घेतले होते. उपनयनानंतर संध्यावंदन, बटूने करावयाचे नित्यानुष्ठान श्री वेंकण्णा नियमित करीत असे. पण वेदाध्ययन आणि शास्त्राभ्यास यांच्या शिक्षणापासून तो वंचित राहिला होता. या शिक्षणाची सोय करुन देण्याचे काम त्यांना करता आले नाही. पण श्री वेंकटेश्वरच सर्वांचा कर्ता-करविता आहे हा दृढविश्वास त्यांच्या मनी पूर्णपणे खोलवर रुतला होता.

## आईवडिलांचे मरण आणि श्री राघवेंद्रांचा विवाह

पुढे काही वर्षांनी आई दीर्घ आजाराने मरण पावली. तिला मरण आले सौभाग्यवतीचे. ती एक महापतिव्रता आणि साध्वी स्त्री होती. त्याकाळी पतिव्रता स्त्रिया अशी आशा घट्ट मनी धरत आणि देवाला इच्छापूर्तीसाठी प्रार्थना करीत असत. काही महिन्यांच्या अंतराने वृद्धाप्यामुळे वडीलहि निधन पावले. श्री राघवेंद्र आणि श्री वेंकण्णा पोरके झाले. शेजाऱ्यांनी एका वर्षापर्यंत या मुलांची काळजी घेतली. थोरांनी श्री राघवेंद्राला विवाह करुन लहान भावाची काळजी घेत संसार थाटण्यासाठी उपदेश केला. श्री राघवेंद्र विवाहबद्ध झाला. पण ते एका दुष्ट कन्येशी. या कन्येचे नाव होते श्रीमती कावेरी. श्री राघवेंद्राच्या मनातला हेतू तसा चांगला होता, की पत्नी कावेरी श्री वेंकण्णाची देखभाल करील आणि मातृवात्सल्य पुरवील. जेणे करुन श्री वेंकण्णांच्या पुढील शिक्षणास आणि जीवनास सहकारी ठरेल. पण घडत गेले आगळेच. श्री राघवेंद्र तसा सुसंस्कृत होता. ते पौरोहित्याच्या कामानिमित्त गावोगावी जात असत. हे काम आणि थोड्याफार शेतीवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून होता. यामुळे घरातला सारा कारोभार श्री कावेरी बाईचाच असायचा.

## वहिनीकडून अतोनात त्रास आणि छळ

श्री वेंकण्णांचे पुढचे शिक्षण तर झाले नाहीच परंतु त्याच्या वाटेला आली घरातील सारी कामे जसे झाडलोट, पाणी आणणे, भांडी घासणे, कपडे धुणे, जळण आणणे गाईची धार काढणे वगैरे वगैरे. ही सारी कामे ते निमूटपणे करत असत. बाहेर असतांना तो गाई वासरे, पशुपक्षी या बरोबर रमायचा. घरी परतले की वहिनीची कटकट, श्री वेंकण्णांना वहिनीकडून प्रेम-वात्सल्य तर कधीच लाभले नाही. कजागिणी वहिनी त्याच्या कामावर कधीच संतुष्ट नसायची. ती पंक्तिभेदहि करत असे. श्री वेंकण्णांना शिळे जेवण द्यायची तर नवऱ्याला आणि स्वत:ला ताजा स्वैयंपाक करुन घ्यायची. ''आलीया भोगासी असावे सादर'' या उक्तिप्रमाणे श्री वेंकण्णा आपले जीवन जगत होता. पण अगदी समाधानपूर्वक.

एके दिवशी तर श्री कावेरीबाईने कमालच केली. आणि विचित्र घटनेस कारणीभूत झाली. उन्हात काम करुन श्री वेंकण्णा दमूनभागून घरी आला होता. त्यांनी वहिनीस ताक पिण्यास मागितले. ताक तर दिले नाहीच, उलट वाईट शब्दात शिवीगाळी केली. फार अपमानास्पद बोलली. श्री वेंकण्णा गहिवरला. मनातून खिन्न झाला. शेवटी सहनशीलतेलाहि काही मर्यादा असतेच ना. श्री वेंकण्णांच्या मनाचे संतुलन तुटून पडले आणि ठरविले की आता घर सोडून बाहेर पडायचे आणि घर सोडून बाहेर आला.

## घरत्याग आणि तिरुपतीकडे वाटचाल

घरातून श्री वेंकण्णा बाहेर पडला खरा पण जायचे कोठे अशा विचारात असताना एक जनसमूह मिरवणुकीत जात असताना दिसला. ही मिरवणूक श्री वेंकटेश्वराची मूर्ती पालखीत बसवून स्वरनादात आणि तालवद्याच्या गजरात तिरुपतीकडे चालली होती. श्री वेंकण्णाहि त्यात सामील झाला. त्यांच्या आईने श्री वेंकण्णांना श्री वेंकटेश्वराविषयी भक्ति आधीच पेरलेली होती. आईने सांगितलेली ध्रुवकुमाराची कथा त्यांच्या आठवणीत आली. श्री ध्रुवकुमार जसे सावत्रआईच्या त्रासामुळे घरदार सोडून गेला होता आणि



धनदाट वनी जाऊन घोर तपश्चर्या करुन श्री हरीची कृपा मिळविली आणि पर्यायाने त्यांने आकाशात ध्रुवतारा म्हणून अढळपद प्राप्त करून घेतले. अशी घटनाहि माझ्याबाबत का घडू नये असा विचार श्रीवेंकण्णांच्या मनात आला असावा. श्रीवेंकण्णा भक्तसमूहात शिरला आणि टाळमृदंगांच्या गजरात व तंबोरीच्या स्वरनादात तल्लीन झाला. भारावून गेला. श्रीवेंकण्णा आईने शिकविलेली संकीर्तने गाऊ लागला. असा असतो साधुजनांचा आणि सद्भक्तांच्या संगतीचा परिणाम. मिरवणुकीत जात असतांना श्रीवेंकण्णांनी वाटेत एका वयस्कर सद्भक्ताना विचारले की मीसुद्धा तिरुपतीला येऊ शकतो का ? सद्ग्रहस्थांनी श्रीवेंकण्णांना सकारात्मक उत्तर दिले. श्रीवेंकटेश्वराची इच्छा तशीच दिसते. अवश्य यावे असे उत्तरले. श्रीवेंकण्णांचा आनंद दुणावला.

जेथे जेथे आपत्ति विपत्ति ।
जर लाभे साधुसंतांची संगति ।।
विपत्ति आपत्ति दूर राहती ।
नि:संशय तेथे मिळेल सद्गति ।।

श्रीवेंकण्णांच्यविषयीसुद्धा भक्तसमूहाची संगत असेच काहीतरी घडवून देईल हे निश्चित होते. श्रीज्ञानेश्वरांनी त्यांच्या 'ज्ञानेश्वरांचा आंधळा' या कृतीतहि खाली दिल्याप्रमाणे असेच काहीतरी नमूद केलेले दिसते.

साधूसंत मायबाप तिही दिले कृपादान ।
पंढरीच्या यात्रे नेले घडले चंद्रभागे स्नान ।।
पुंडलीक वैजराजे पूर्वी साधिले साधन ।
वैकुंठीच्या मूळपीठा डोळा तयाला ते अंजन ।।
कृष्णांजन एकवेळ डोळा घालता अढळ ।
तिमिर दु:ख सारे फिरले भ्रांतीचे पडळ ।।
श्रीगुरुनिवृत्तिराजे मार्ग दाविला सोज्वळ ।
बापरखुमादेवीवर विठ्ठल दीनांचा दयाळ ।।

असे असते साधुसंतांच्या संगतीचे माहात्म्य आणि महती.

त्याकाळी तीर्थयात्री जाणे ते केवळ पायचालण्याने दोन एक महिन्यांच्या प्रवासानंतर श्रीवेंकण्णा आणि भक्तसमूह सप्तगिरीच्या पायथ्याशी पोहोचला. पुढचा मार्ग अवघड होता पर्वत चढून जावयाचे होते. त्यावेळी श्रीवादिराजस्वामींची कथा श्रीवेंकण्णांना ऐकण्यास मिळाली. श्रीवादिराजस्वामी उडुपीच्या सोदे मठाचे मठाधीश होते. अष्टमठातील हा एक मठ. दास साहित्यात श्रीवादिराजस्वामींचा फार मोठा वाटा आहे. 'हयवदन' या अंकिताखाली त्यांचा भजन संग्रह सापडतो. संस्कृतमध्येहि त्यांनी अनेक ग्रंथ, स्तुती-स्तोत्रे व कन्नडमध्ये काव्यरचना केलेली आहे. श्रीवादिराजस्वामी श्रीवेंकटेश्वराच्या दर्शनास तिरुपतीस जातांना सप्तगिरीच्या पायथ्याशी ते आले. तेथे त्यांना सप्तगिरी पर्वत एक अखंड शालीग्रामशिलेसारखा भासला. शालीग्राम पायांनी कसा तुडवायचा हा प्रश्न त्यांच्या मनात शिरला. म्हणून त्यांनी गुडघे टेकत टेकतच पर्वतारोहण केले. ही कथा ऐकून श्रीवेंकण्णांची श्रीवेंकटेश्वरावरची श्रद्धाभक्ति अधिकच बळावली.

## पर्वतारोहण आणि प्रप्रथमदर्शन

पर्वत चढून श्रीवेंकण्णा आणि भक्तसमूह श्री वेंकटेश्वराच्या देवालयात येऊन पोहोचले. ती पहाटेची वेळ असावी. स्वामी-पुष्करणीत स्नान करुन नित्यानुष्ठान संपविले. भक्तसमूह देवालयाकडे वळला. श्री वेंकण्णांनी मात्र थोडा उशीर केला. कारण श्री वेंकटेश्वराच्या देवालयातील अलोट गर्दी कमी होण्यासाठी. गर्दी कमी झाल्यावर त्यांनी श्री वेंकटेश्वरांचे दर्शन घेतले. श्री वेंकटेश्वरांची दिव्य मूर्ती पाहून श्री वेंकण्णा मंत्रमुग्ध झाला. आणि स्वत:वरचे भान हरपून बसला. आजूबाजूला काय घडत आहे याची त्यांना जाणीवच राहिली नव्हती. तो एकाच ठिकाणी नि:शब्दपणे डोळे मिटून उभे होता. एका सेवकाने त्यांना जागृत करुन बाहेर पाठविले. हे श्री वेंकण्णांचे प्रप्रथम दर्शन होते. बाहेर आल्यानंतर भक्तसमूहाबरोबर इतर हरिदासांच्या



संकीर्तनात सहभागी झाला. दुपारच्या नैवेद्यानंतर प्रसाद वाटण्यात आला. कांही दिवसानंतर त्यांच्या लक्षात आले की अशी दिनचर्या येथे नित्य चालते. नित्याच्या या कार्यक्रमामुळे श्री वेंकण्णांच्या मनात प्रसन्नता उमलली. त्यांनी ठरविले की काही काळ तरी तिरुपतीत रहावे. त्याप्रमाणे त्यांनी तिथेच वास्तव्य केले. भक्तसमूह परतला. श्री वेंकण्णा सुमारे १५ ते २० वर्षे तिथे राहिला असावा. कारण देवांचा अनुग्रह होण्यास किमान एक तपाचा (म्हणजे १२ वर्षे) काळ तरी लागतो. याबाबतचा अधिक विचार पुढे संदर्भानुसार येईलच.

## तिरुपतीचे वास्तव्य, साक्षात्कार आणि स्वरुप दर्शन

तिरुपतीत राहण्याचे ठरल्यानंतर त्यांनी एक दिनचर्याच आखली . ब्राह्ममुहूर्ति उठणे, प्रातर्विधी उरकून पुष्करणीत स्नान करणे. संध्यावंदन व नित्यानुष्ठान संपवून श्री वेंकटेश्वरांचे दर्शन घेणे. हे सगळे प्रभात समयी अरुणोदयाच्या आधी आटोपणे. नंतर जेथे जागा मिळेल तेथे बसून श्री वेंकटेश्वरांचे चिंतन व नामस्मरण करणे. दुपारी पूजेच्यावेळी परत हजर रहोणे. पूजेच्यावेळी स्तुति-स्तोत्रे म्हणणे. तीर्थप्रसादानंतर पुन्हा श्री वेंकटेश्वरांच्या चिंतनात, नामस्मरणात आणि ध्यानधारणेत मग्न होणे . रात्रीहि आरती संपवून कोठेतरी दगडावर झोपायचे. झोप येईपर्यंत वरील उपक्रम राबवायचा. श्री वेंकण्णांनी अस खडतर जीवन आरंभिला होता. तो चिंतन-ध्यानधारणेत मग्न असतांना श्री वेंकटेशांबरोबर एकतर्फी संवादहि साधित असे. आणि बरेच प्रश्नहि करीत असे. का तुम्ही मला या भूमीवर घेऊन आलात? आणि कशासाठी? का मला अशिक्षित आणि अज्ञानी केलेत? पुढे त्यांनी श्री वेंकटेश्वरांच्या निजस्वरुपदर्शनाची आणि साक्षात्काराची महत्वाकांक्षा बाळगून ती मिळविण्याचा दृढसंकल्प केला. आता देवालयातील अर्चकवर्गीहि त्याला चांगलाच परिचित झाला होता. श्री वेंकण्णांना ते सर्वलोक एक सद्व्यक्ति म्हणून ओळखत होते. त्यांना श्री वेंकण्णांच्या व्यक्तिमत्वाची जाण होती. त्यामुळे श्री वेंकण्णांना देव्हाऱ्याच्या गाभार्यात येण्याजाण्याची मुभा होती.

एके दिवशी श्री वेंकण्णा आपल्या श्री वेंकटेश्वरांना निजरुपात पाहण्याची आणि त्यांच्या साक्षात्काराची संकल्पना मनात घट्ट पकडून श्री वेंकटेश्वरांच्या चरणी पडला. आणि निश्चयपूर्वक सांगितले की जोपर्यंत तूझे निजरुप दर्शन होत नाही आणि साक्षात्कार होत नाही तोपर्यंत चरण सोडणार नाही. हवे असेल तर तुझ्या चरणांवर माझे प्राण अर्पण करीन. देवांना अनन्यभावे शरण जाणे, आत्मनिवेदन करणे आणि आत्मसमर्पण करणे हे सारे नवविध भक्तितील प्रकार म्हणायचा. भक्तिच्या मार्गाचा अवलंब करताना श्री वेंकण्णा समाधीत शिरला आणि स्वत:वरचे भान हरपून बसला. भक्ताची निश्चल भक्ति, दृढसंकल्पना आणि पराकाष्ठेची निष्ठा पाहून श्री वेंकटेश्वर संतृप्त झाला. श्री वेंकण्णांना त्यांनी निजरुप दाखविले आणि साक्षात्कार घडविला. श्री वेंकण्णांच्या जिभेवर 'प्रसन्नवेंकटेश' असे नामांकन लिहिले. श्री वेंकण्णा समाधीत होता. वरील घटनेमुळे श्री वेंकण्णा समाधीतून जागे झाला. त्यांना दृष्टांत झाल्याचे आठवले. यावेळी श्री वेंकटेशासमोरच त्यांनी आपले पहिले कीर्तन रचले आणि त्याचा भावात्मक मराठी अनुवाद खाली दिला आहे.

बाप्पा! कसा पावलासी रे मजला ।
माझे दोष, अवगुण आणि पाप ना पारखता ।।
निर्दोषी तूं देवा सदा सर्वथा ।
तिरुमलेशा त्रिगुणातीता ।। ध्रु ।।

पाया पासूनी मस्तका पर्यंत ।
अंगांग भरलेली माझी पाप ।।
दया करूनी तारीलेस मजला ।
निवारूनी सारी ही माझी पाप ।। १ ।।

त्रिजगती पाप विनाशक ।
म्हणूनी तूंझा अगाध महिमा ।।



दीन दयाळा भक्त वत्सला ।
श्री रामा सद्गुण धामा ।। २ ।।

आंता न घडूद्यावे मजहूनी
कांही पाप आणि दोष ।
करभयशमन दे वरदान ।
राहीन पुढे निष्पापी आणि निर्दोष ।। ३ ।।

प्रसन्न वेंकटा मजला प्रसन्नोनी ।
दीलेस तूंझे नामांकीत ।।
तूंझी आज्ञा शिरसा वंद्य मानुनी ।।
चालवीन जीवन पुढील काळात ।। ४ ।।

**'अज्ञानी बालक अपरोक्षज्ञानी'.**

श्री वेंकटेश्वरांनी श्री वेंकण्णांना सूचित केले की यापुढे त्यांनी 'प्रसन्नवेंकटेश' या नामांकनाने संकीर्तने रचावीत आणि भजन संकीर्तनाद्वारे आपल्या प्रदेशात भक्तिमार्गाचा प्रचार करावा. श्री वेंकटेश्वरांनी आदेश दिला की श्री वेंकण्णांनी मुख्य अर्चकासह कल्याणोत्सवसमयी कल्याणमंटपात यावे. मुख्य अर्चकालाहि असाच काही प्रकार दृष्टांत स्वरुपात त्यांच्या स्वप्नात दिसला असावा. कारण कल्याणोत्सवाच्या दिवशी मुख्य अर्चकाने श्री वेंकण्णांना बोलोविले. अर्चकांच्या हातात एक पेटी होती. ते दोघेहि कल्याणमंटपात आले. अर्चकांनी श्री वेंकण्णांच्या हातात आणलेली पेटी दिली. श्री वेंकण्णांनी ती पेटी उघडली. बघतात तो काय त्यात श्रीदेवी-भूदेवी समेत श्री वेंकटेश्वरांची दिव्य सुंदर मूर्ती होती. त्याबरोबर एकतारी व करताळाहि ठेवले होते. एक भिक्षापात्रपण होते. ती दिव्य मूर्ती पाहून श्री वेंकण्णा हळवा झाला आणि डोळे मिटून ध्यानस्थ बसला. थोड्यावेळाने डोळे उघडले तेव्हां मुख्य अर्चका समोर जमलेल्या सुजनांना काहीतरी सांगत होते.

श्री वेंकण्णा काही सामान्य व्यक्ति नांही. श्री वेंकटेश्वरांनी त्यांना निजरुपदर्शन दिले आहे. यापुढे तो 'प्रसन्नवेंकटदास' म्हणून ओळखला जाईल. या पुढे इथेही श्री वेंकण्णाचा उल्लेख संदर्भानुसार बहुवचनी केला जाईल.

एके दिवशी श्री वेंकटदास भजन-संकीर्तनात दंग असताना एका गृहस्थाने त्यांना विचारले की मी अन्य हरिदासांची भजने ऐकलेली आहेत. त्यांच्या भजनात विठ्ठलाचा उल्लेख येतो. तुमच्या भजनात प्रसन्नवेंकटेश असा उल्लेख असतो ते का? श्री वेंकण्णा काहीच बोलले नाहीत. बहुतेक श्री वेंकण्णांनी 'प्रसन्नवेंकटेश' नामांकन मिळालेल्या दिवसापासूनच आपली स्वत:ची भजने रचण्यास सुरुवात केली असावी. अर्थातच पहिले संकीर्तन श्री वेंकटेश्वरा समोरच रचलेले होते ते कीर्तन वर दिलेलेच आहे.

वरील साऱ्या गोष्टीची सात्यता पटते ते प्रसन्न वेंकटदासाचे समकालीन श्री गोपाल दासांच्या कीर्तनावरून श्री गोपालदासानी बागलकोटला भेट दिली होती. ही भेट केंव्हा दिली होती, हे निश्चित पणे सांगत येत नांही. प्रसन्न वेंकटदासाना श्री वेंकटेश्वरांच्या वरदानांचे आणि दासांच्या कृती आणि गुणवत्तेचे वर्णन श्री गोपाल दासानी त्यांच्या कीर्तनांत वर्णन केले आहे. ही कृती भजन संग्रहात शेवटी क्रमांक ३१ मधे पाहण्यास मिळेल.

एकीकडे श्री वेंकण्णांना स्वरुपदर्शनाचा आनंद तर दुसरीकडे श्री वेंकटेश्वरांच्या आदेशानुसार तिरुपति सोडून जाण्याविषयाची खिन्नता. अशा द्विधा मनास्थितीत ४-५ दिवस गेले असतील तेव्हा श्री वेंकटेश्वरांनी श्री वेंकण्णांच्या स्वप्नात येऊन सांगितले की येथून परत जा आणि माझी आज्ञा पालन कर. मी केव्हाहि तुझ्याबरोबरच असेन. जेव्हा जेव्हा तू दर्शनाची इच्छा करशील त्यावेळी तुला दर्शन मिळेल. तू आता लगेचच नीघ. संचार करीत करीत, भक्तिमार्ग सामान्य जनांपर्यंत पोहोचव श्री वेंकण्णांनी तिरुपति सोडण्याचा निर्णय घेतला आणि तिरुपति सोडली.



## परतीचा प्रवास

श्री प्रसन्नवेंकटदासानी श्री वेंकटेशाचे दर्शन घेऊन प्रसाद स्वीकारला आणि बागलकोटची वाट धरली. प्रवासात जेथे जेथे मोठी क्षेत्रे आणि देवालये यायची तेथे पुण्यजळी स्नान करुन देवदेवतांचे दर्शन घेत असत. यातील काही महत्वाची स्थळे म्हणजे मुळबागल, हंपी आणि मंत्रालय, मुळबागल याचा अर्थच मूळ दरवाजा. या महाद्वारातूनच प्रयाणिक तिरुपतीला जात असत. परततानासुद्धा या द्वारातूनच परतत असत. शिवाय मुळबागलमध्ये द्वैतसंप्रदायाचे यतिश्रेष्ठ श्री श्रीपादराजतीर्थ यांची मूळ समाधि आहे. यांचे प्रख्यात शिष्य श्री व्यासराजतीर्थ यांनी विजयनगर साम्राज्य चालविले होते. जेव्हा एकदा तेथील महाराजाला कुयोग प्राप्त झाला होता. त्यावेळी हंपी विजयनगर साम्राज्याची राजधानी होती. आजहि हंपी हे एक मोठे ऐतिहासिक स्थान म्हणून जगभर प्रसिद्ध आहे. येथील विठ्ठल मंदिर प्रेक्षणीय आहे. तेथील महाराणी विठ्ठलाची परमभक्त होती. तिच्या इच्छेप्रमाणे राजाने पंढराची विठ्ठलमूर्ती आणून स्थापना केली होती. अशा रीतीने पंढरीचा राजा तेथे आला. काही वर्षानंतर विठ्ठलाने पंढरपूरास जाण्याची इच्छा दर्शविली. राजा आणि राणीच्या स्वप्नात येऊन श्री विठ्ठलाने आपली इच्छा निवेदली. नाइलाजास्तव राजाने तदनंतर मूळ पंढरीची मूर्ति परत पाठविली आणि दुसऱ्या मूर्तिची प्रतिष्टापना हंपीस केली, अशी एक आख्यायिका आहे. ही घटना श्री ज्ञानेश्वरांच्या अगोदरच्या काळी घडली असावी. म्हणूनच की काय त्यांनी एका भजनात 'कानडा हो विठ्ठलू कर्नाटकू' असे म्हटलेले आहे.

मंत्रालय तर एक पुण्यक्षेत्र आहे. आणि इ.स. १६७१ पासून प्रसिद्ध आहे. कलियुगातील कामधेनू म्हणून प्रसिद्ध पावलेले श्री राघवेंद्रतीर्थ एक पवाड पुरुष होऊन गेले. श्री ज्ञानेश्वरांप्रमाणे श्री राघवेंद्रतीर्थांनी इ.स. १६७१ मधे जिवंत समाधि घेतली. आजहि त्यांच्या आशीर्वादाने अनेक चमत्कार घडलेले भक्तांना अनुभवास येतात. भाविकांची येथे सतत झुंबड लागलेली असते. एके दिवशी रात्रीच्या शेवटच्या प्रहरी श्री प्रसन्नवेंकटदास

मंत्रालयास पोहोचले. ब्राह्मीमुहुर्ती तुंगभद्रेत स्नान करुन अनुष्ठान संपविले. प्रथम ग्रामदेवता श्री मंचालम्मा (दुर्गादेवी), नंतर अनुक्रमे हनुमान आणि रुद्रदेवाचे दर्शन घेतले. या तीनहि देवतांची प्रतिष्ठापना श्री राघवेंद्रस्वामीजींनीच केली होती. त्यांच्या दर्शनानंतर श्री प्रसन्नवेंकटदास हे श्री राघवेंद्रस्वामीजींच्या वृंदावनापाशी आले. त्यांना श्री राघवेंद्रस्वामीजींचे योगनिद्रेत असल्याचे दिसले. दर्शन झाले. ब्राह्ममुहूर्त टळून जाईल म्हणून श्री राघवेंद्रस्वामींना योगनिद्रेतून उठवण्यासाठी एक भूपाळी रचली. कन्नडमधे भूपाळीला उदयराग म्हणतात. ही अनुवादित भूपाळी पुढे दिली आहे.

**उदयराग (भूपाळी)**

श्री राघवेंद्रा यतिवरा । ब्राह्ममुहूर्त टळून गेला ।।
उठ लवकरी गुरुवरा । सुप्रभात समय जवळ आला
।। ध्रु ।।

सोड योगनिद्रा, ये सत्वरी वृंदावनातूनी बाहेरी ।
भक्तगण आहे जमला तुझ्या दर्शनास प्राकारी ।।
दे दर्शन, दाखव तव पादयुग्म साऱ्या भक्तगणाला ।
लावू दे पादधूळ भक्तांना, त्यांच्या
कपाळाला, दया समुद्रा श्री राघवेंद्रा ।। १ ।।

गुरफटलेला मी आशा दुराशेच्या व्यसनांनी ।
मुस्कट बांधुनी पडलो मी मोह जाळी गेलो फसुनी ।।
असुरांतकांचे कधीच नाही मी केले स्मरण ।
भलतीच झाली घडवण, देह गेला विटुनी पूर्ण,
बीजेचा चंद्रा श्री राघवेंद्रा ।। २ ।।



मी माझेपण, अहंकारादि दुर्गुण बिंबवली मी मनी ।
सुकर्म नाही घडले बांधुनी गेलो मी माझ्या दुष्कर्मांनी ।।
नाही केली निवड योग्य अयोग्य कर्माची, पापी अज्ञानी ।
स्वामी कर उद्धार जीवनक्रम माझे दे सुधारुनी,
कुमुदेचा चंद्रा ।। ३ ।।

दुर्जनांच्या हाती सापडुनी तूझ्या भक्ताला केले दूर ।
झाला अन्याय माझ्याहून असा अपराध महाघोर ।।
वागलो मी मद मस्तीच्या धुंदीने अख्या जीवनभर ।
हा नसे माझाच विचार, तो तूंझाची असावा
श्री यतिश्रेष्टा राघवेंद्रा ।।४।।

नाही वाचले वेदशास्त्र, न च घेतले त्यांना ऐकून ।
भेदाभेद विषय नाही घेतलो केव्हांहि समजून ।।
न मिळविली साधूसंत प्रीति त्यांच्या संगति राहून ।
झाला मानभंग अभिमान राखिला नांही म्हणून
शिष्यप्रिय यतींद्रा राघवेंद्रा ।। ५ ।।

आशा निराशेच्या खेळखेळात अडकले जीवन ।
क्लेश भोगले भवसागरात सतत पडून ।।
अजून किती जन्मा यावे न येई मजला कळून ।
यायचे जन्मी तर यावे श्री वेंकटेश्वराचे दास म्हणून ।।
प्रसन्न चित्ताने येऊन, कर मार्गदर्शन,
श्री गुरुवरा राघवेंद्रा ।।६।।

श्री राघवेंद्रस्वामींनी श्री प्रसन्नवेंकटदासांना आपले दर्शन दिले, आणि अनुग्रह केला. अरे दासा तू तर साक्षात् श्री हरिकडून वरदान घेऊन आलेला

दास. श्री वेंकटेश्वराच्या आज्ञेनुसार भक्तिपंथाचा प्रचार कर. या पंथाची शिकवण तुझ्या भक्तिभजनातून आणि संकीर्तनातून सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचव. श्री वेंकटेश्वराच्या आदेशाप्रमाणे माझीहि इच्छा राहणार. तुला वाहिलेल्या कार्यात तू यशस्वी व्हावेस हीच माझी आशा. माझे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेतच. श्री राघवेंद्र गुरुवर्यांचे आशीर्वाद घेऊन श्री प्रसन्नवेंकटदास बागलकोटास निघाले.

## बागलकोटला आगमन

मंत्रालय सोडले कांही दिवसांच्या प्रवासानंतर बागलकोटला पोहोचले. तेथील एका मारुतीमंदिरात ठाण मांडले. रोजचा कार्यक्रम सुरु केला. पहाटे उठावयाचे. घटप्रभेत स्नान करुन मंदिरात यावयाचे. श्री वेंकटेशाची नैवेद्यापर्यंत पूजा करुन भिक्षेस जावयाचे. शुचिर्भूत सज्जनांकडून आणलेले अन्न आणून नैवेद्य करावयाचे. पूजा आटपून प्रसाद घ्यावयाचे. नंतर संकीर्तने गायचे. भजनसंकीर्तनाच्या गाण्यामुळे मारुती मंदिरात दिवसेंदिवस गर्दी वाढू लागली. कोणीहि दासांना ओळखले नांही. काही दिवसानंतर मारुतीमंदिराच्या अर्चकाने दासांना विचारले की तुम्ही कोठून आलात? आपले नाव काय? आतापर्यंत अनेक दासांची भजने ऐकली आहेत पण प्रसन्नवेंकट असे नामांकन ऐकण्यात आलेले नाही. दासांनी उत्तरले की मी कोठून आलो हे मला माहित नाही. अर्चकाने स्पष्ट केले की दासवर्या तुम्हाला अध्यात्मिक प्रश्न विचारत नसून मुद्धा आहे लौकिकाचा. श्री प्रसन्नवेंकटदास त्यावळी ध्यानमग्न होते. हळूहळू डोळे उघडले. मग अर्चकांच्या नावाने हाक मारली. अहो आजोबा रामण्णा, मला तुम्ही नाही का ओळखलत? मी हे शहर जेंव्हा सोडले तेव्हा एक अशिक्षित अज्ञानी होतो. आणि त्यावेळी मी १०-१२ वर्षांचा असेन. आणि आता आलो आहे दासांच्या रुपात. निदान १५ वर्ष तरी लोटली असावीत. सहाजिक आहे की या कालांतराने कोण कसे ओळखेल? रामण्णांची खात्री पटली की हा तर आमचा पूर्वीचा वेंकण्णा. एवढे झाल्यानंतर श्री दासांनी परत आपले डोले



मिटले आणि मारुतीवर कीर्तने गाऊ लागले. श्री वेंकण्णांच्या दासरुपातील आगमनाची वार्ता सर्व शहरभर पसरली. मारुतीमंदिरात जमलेला भक्तवर्ग आश्चर्यात बुडला. त्यांना जाणीव झाली की हा काही सामान्य दास नाही. त्यांना श्री हरिचे निजरुपदर्शन आणि साक्षात्कार घडला आहे.

ही बातमी श्री प्रसन्नवेंकटेशांचे वडिलबंधु व त्यांच्या पत्नी यांच्या कानावरही पडली. श्री राघवेंद्र आणि वहिनी श्री कावेरी अम्मा धावतच मारुतिमंदिराकडे आले. श्री प्रसन्नवेंकटेशदासांनी त्यांचे अभिवादन केले. वहिनीला आपल्या दीराला दिलेल्या वागणुकीबद्दल मोठा पश्चात्ताप झाला होता. तिने गहिवरुन श्री प्रसन्नवेंकटदासांकडे क्षमायाचना केली. त्यांचे पाय धरण्याचे प्रयत्न केले. परंतु दासांनी तिला अडविले. वहिनी तुम्ही मानाने मोठ्या आहात. असे तुम्ही करु नये. काय नम्रता आणि क्षमाशीलता असते ती सज्जनात. वहिनी, तुम्ही जर तश्या वागल्या नसत्या तर तुम्ही मला या अवस्थेत वा रुपात पाहिलेच नसते. उलट मीच तुमचे आभार मानतो. भाऊ श्री राघवेंद्र आणि वहिनींनी श्री प्रसन्नवेंकटदासांना घरी येण्याची विनंती केली. प्रथम दासांनी त्याला होकार दिला नाही. दररोज भाऊ आणि वहिनी मारुतिमंदिरात यायचे आणि घरी येण्याबद्दल विनवणी करायचे. अशावेळी प्रत्येक दिवशी आपल्या साध्वी आईची आणि बाबांची आठवण यायची. या दोघांनी श्री प्रसन्नवेंकटदासांवर उत्तम संस्कार घडविले होते. या आठवणींनी दासांचे मन भारावून जायचे. त्यांना 'मातृदेवो भव. पितृदेवो भव.' या उपनिषदातील वाक्यांचे स्मरण व्हायचे. श्री प्रसन्नवेंकटदासांनी घरी येण्यासंबंधी आपली संमति दर्शविली. आणि त्याप्रमाणे आपल्या घरी येऊन वास्तव्य मांडले.

## घरप्रवेश

स्वत:चे घर, त्यात एक स्वतंत्र देवघर. घरातल्या देवमूर्ति आणि शालीग्राम वगैरे होतेच. आपणास मिळालेली श्री-भूदेवीसमवेत असणारी श्री वेंकटेश्वराची मूर्तिहि भक्तिपूर्वकरीत्या देवघरात प्रतिष्ठापना केली. श्री

राघवेंद्र घरातल्या विग्रहांची पूजा नित्य करीत होते. आता सर्व मूर्तिंची पूजा श्री वेंकटदासच करु लागले. सकाळचे नित्यानुष्ठान आणि पूजा करायचे. संध्याकाळी मारुतिमंदिरात येऊन नवीन नवीन भजनसंकीर्तने गात असत. याचा अर्थ असा नाही की ते शेवटपर्यंत बागलकोटलाच राहिले.

श्री वेंकटेशाच्या आदेशानुसार भक्तिमार्गाचा प्रसार करण्यासाठी श्री प्रसन्नवेंकटदास गावोगावी जात असत. आणि परत बागलकोटला येत होते. बागलकोट प्रमाणेच त्यांनी जवळच असलेल्या बदामी गांवातहि त्यांचे वास्तव्य होत असे. बदामी म्हटले की वाचकांना सहाजिकच आठवेल की हे एक देवताक्षेत्र आहे. श्री बदामी बनशंकरी किंवा श्री शांकभरीदेवी या नावांनी ही अतिप्रसिद्ध आहे. कर्नाटकातील, विशेषत: उत्तरकर्नाटकातील आणि महाराष्ट्रातील कित्येक कुळांची ही कुलदेवता आहे. श्री प्रसन्नवेंकटदासांनी बदामीत एक कट्टा केला होता. आजतागायतहि हा कट्टा तेथे आहे. या कट्यावर बसून श्री प्रसन्नवेंकटदास भजन संकीर्तने गात असत. जवळपासच्या खेड्याना आणि गावांनाहि ते भेटी देत असत. अशा भजनसंकीर्तनाद्वारे भक्तिपंथाचा प्रसार अखंड चालू ठेवला. या कार्यक्रमाच्या गर्दीत त्यांच्या मनात एक विचार कायम खटकत होता आणि तो म्हणजे विद्यागुरु मिळविण्याचा.

## गुरुचा शोध

'गुरुविन न लगे मुक्ति' तसेच 'जोवरि न होसी गुरुचा गुलाम तोवरि न पोहोचसी मुक्तिधाम' अशा म्हणी त्यांना आठवायच्या. श्री राम, श्री कृष्ण यांनीहि अनुकमे श्री वशिष्ठ आणि श्री सांदीपनी ऋषींना आपआपल्या अवतारात गुरु केले होते. याची जाणीव दासांना होती. त्यांनी गलगलीचे श्री मुद्गल आचार्यांना आपले गुरु म्हणून निवडले. बागलकोट प्रमाणेच गलगलीहि महानपंडितांचे घर होते. श्री मुद्गल आचार्य वेदशास्त्रात एक प्रकांड पंडीत होते. वेदशास्त्रातील सूक्ष्मविचार, श्री सुधाग्रंथाचे अध्ययन



करण्यास सामान्यत: १२ ते १५ वर्षांचा कालावधी लागतो. श्री वेंकटदासांनी, श्री वेंकटेश्वराच्या प्रसादामुळे तल्लख झालेल्या बुद्धिमत्तेमुळे, सुमारे ८ ते १० वर्षातच अध्ययन संपविले. या अध्ययनाचा परिणाम त्यांच्या विविध ग्रंथ लिखाणावर झाला जसे दशमस्कंध भागवत, सत्यभामा विलास, समस्वनाम मणिगण षटचरण पद्यमाला, भ्रमरगीता आणि विष्णुसहस्रनाम, ह्या साऱ्या कृती कन्नडमध्ये त्यांनी रचलेली आहेत. त्यात भागवतग्रंथ फारच प्रसिद्ध आहे.

## भजनसंकीर्तन रचना

आजपर्यंत उपलब्ध झालेल्या कृतींची संख्या सुमारे ५०० पर्यंत आहे. अजूनहि संशोधन चालूच आहे. हे कार्य प्रसन्नवेंकट सांस्कृतिक धार्मिक दत्ती विश्वस्त मंडळ करत आहे. त्यांची कांही कीर्तने प्रसिद्ध गायक दि.पं. भीमसेन जोशी आणि इतर महागायकांनी गायलेली आहेत. आपल्या भजनात दासांनी मराठी आणि उर्दू भाषेतील शब्दांचाहि वापर केल्याचे आढळते.

## चरित्रलेखन

श्री प्रसन्नवेंकटदासांसारख्या सज्ञनांचे चरित्र निरुपण करणे हे एक कठिण काम आहे. कारण अशा व्यक्तींनी आपल्या विषयी काहीच लिहून ठेवलेले नसते. आत्मचरित्र लिहिण्याचा प्रकार मागील काळी अस्तित्वाच नव्हता. त्यामुळे त्यांच्या लिखाणांवरुन अंदाज बांधावे लागतात. त्यांच्याविषयी जनसमूहात असलेल्या काही आख्यायिकांची थोडीफार मदत होते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे अशा सज्ञन व्यक्ति प्रसिद्धी विन्मुख असतात. हेच श्री प्रसन्न वेंकटदासांच्या बाबतीतहि घडलेले आहे.

## चमत्कारिक घटना

साधू-सत्पुरुषांच्या जीवनात सामान्यता चमत्कारिक घटना घडल्याचे आढळतात. ह्या घटना असे पुरुष घडवितात असे म्हणण्यापेक्षा त्यांच्याकडून घडवून घेतल्या जातात असे म्हणणे सूक्त ठरेल. कारण या घटनांमागे प्रत्यक्ष परमेश्वरच असतो. मनुष्यप्राणी फक्त निमित्तमात्र असतात. कदाचित् अशा घटनांमागे सर्वसामान्य जनांची दैवावरील भक्ति व साधूसंतांविषयी आदर वाढावा हीच परमेश्वराची इच्छा असणार. श्री प्रसन्नवेंकटेशदासांच्या जीवनातील काही घटना येथे नमूद केल्या आहेत.

## पहिली घटना

बागलकोटजवळ तुळशीगिरी नावाचे एक खेडे आहे. तेथे एक हनुमानाचे मंदिर आहे. हे दैवत अगदी जागृत आहे. या गावात श्री प्रसन्नवेंकटदासांची थोडीफार जमीन होती. त्याची लागवड एक रयत करीत होता. या शेतकऱ्याने दासांना सांगितले की यावर्षी सारे पीक नासून गेले आहे. आणि त्यामुळे काहीहि उत्पन्न आलेले नाही. त्याचा हेतू असा होता की मालकाला काही देऊ लागू नये. दासांनी रयताला म्हटले की तसेच होऊ दे बाबा. खोटे बोलण्याचा परिणाम लगेच दिसून आला. त्यावर्षी खरेच काही पीके आले नांहीत. पुढील २-३ वर्षेहि असेच घडत गेले. तेव्हा रयताला पश्चात्ताप झाला आणि दासांचे पाय धरुन क्षमा मागितली . चांगली पिके यावीत याबाबतीत दासांकडून आशीर्वाद मागितले. दयाळू दासांनी श्री वेंकटेशास स्मरुन आशीर्वाद दिले. तेव्हांपासून दासांना काळ्याजिभेचे दासाचार्य म्हणून तेथील मंडळी ओळखू लागली. काळ्याजिभेची व्यक्ति म्हणजे ती व्यक्ति जे बोलेल ते खरे ठरते अशी प्रचीति आहे.



## दुसरी घटना

एकदा श्री वेंकटदास आपल्या भजनी मंडळींबरोबर तुळशीगिरीहून बागलकोटला परत येत होते. हे अंतर सुमारे १० कि.मी. आहे. वाटेत एक वाघ आडवा आला. वाघाला पाहून जोडीदार मंडळी पळून गेली. दासांनी वाघावर मारुतीचा अंगारा फेकला. वाघ नरमला. दासांनी आपली श्री वेंकटेश्वराची पेटी वाघाच्या पाठीवर ठेवून आपल्या बरोबर येण्यास सांगितले. वाघास पशुपक्ष्यांची आणि प्राणीमात्रांची हिंसा न करण्याबाबत बजाविले. वाघ शांतपणे बागलकोटपर्यंत आला. दासांनी आपली पेटी काढून घेतली. आणि वाघास शांतपणे जंगलात जाण्यास सांगितले. वाघ जसा आला होता तसाच निघून गेला. योगी पुरुषांना असे घडविणे काही अवघड नाही मराठी वाचकांना आठवेल की योगी श्री चांगदेव श्री ज्ञानेश्वरांच्या भेटीसाठी वाघावर बसून आले होते. आणि चाबूक म्हणून एक साप ठेवला होता. श्री ज्ञानेश्वरानी तर निर्जीव भिंतच चालविली होती.

## तिसरी घटना

ही घटना श्री वेंकटदासांनी एकाचवेळी दोन देह धारण केल्याविषयी आहे. एके दिवशी दोन यजमानांनी श्री वेंकटदासांना आपआपल्या घरच्या समारंभात भोजनास बोलविले होते. दासांनी ध्यानचिंतनात मग्न असतांना दोघांनाहि होकार दिला होता. त्याप्रमाणे ते गेले देखील. संध्याकाळी बागलकोटमध्ये श्री मारुतीमंदिराच्या कट्ट्यावर हा विषय वादाचा ठरला. एक यजमान म्हणाले की श्री वेंकटदास आज माझ्या घरी भोजनास आले होते. आणि त्यांनी मला उपकृत केले. यावर दुसरे यजमान उत्तरले की श्री वेंकटदास खरोखरी माझ्याकडे आले होते. शेवटी हा वाद श्री वेंकटदासांपर्यंत गेला आणि त्यांनाच विचारले गेले की हे कसे काय घडले गेले? श्री दासांनी आपले डोळे मिटून श्री वेंकटेश्वराचे स्मरण केले आणि डोळे उघडून सांगितले की ही श्री वेंकटेश्वराची लीला आहे. त्यात

माझे पात्र काहीहि नाही. अशा घटना कधी कधी श्री परमेश्वराच्या इच्छेमुळे घडतात. कर्ता एकच तो परमेश्वर! पतंजली योगविद्येनुसार सिद्धपुरुषांना आणि योगी पुरुषांना हे सहज शक्य होते. ही गोष्ट सगळीकडे वाऱ्यासारखी पसरली. आणि तदनंतर मंदिरात भाविकांची गर्दी दिवसें दिवस वाढतच चालली.

श्री प्रसन्नवेंकटदास बागलकोट सोडून बदामीस आले. बदामीत अगस्त्यतीर्थावर श्री दासांनी एका हनुमानमूर्तीची स्थापना केली होती. त्याची ते नित्य पूजा करीत असत. त्याकाळी तेथे पेशवाई राज्य होते.

त्यांचा एक सरदार तेथील कारभार पहात असे. श्री प्रसन्न वेंकटदासांची महिमा सरदाराच्या कानावर पडली होती. एके दिवशी सरदारने आपल्या एका लिपीक कारकूनाला दासांकडे पाठविले, दरबारी येण्यास दासांना आदरपूर्वक आमंत्रण दिले. दासांनी लिपीकाला पाहून एक छोटीशी गम्मत केली. कारकूनाने आपल्या कानात भिकबाळी घातली होती. दासांनी कारकूनाला विचारले की कानावरचे काय आहे? त्यावर कारकून उत्तरला की हा एक अलंकार आहे. जो लिपीक-कारकून जलद गतीने कामे करतो त्याला पेशवे असला अलंकार नजराणा देतात. तो मला मिळालेला आहे. दासांनी कारकूनाला सांगितले की मग एक काम कर, मी तुला एक पद सांगतो ते मला झटकन लिहून दे. तू तर आधुनिक गणपती दिसतोस. पाहू या तुझी कार्य कुशलता. दासांनी पद सांगण्यास सुरुवात केली. पण लिपीकाला आरंभच करता येईना. दास मस्करीने हसले आणि कारकून शरमिंदला असावा. पुढे सहाजिकच पेशवे सरदाराची आणि दासांची भेट आमंत्रणाप्रमाणे झाली असेलच.



## देहावसान

काही वर्षानंतर श्री प्रसन्नवेंकटदासांना आपल्या देहावसानाची सूचना मिळाली असावी. त्याप्रमाणे देहत्याग करण्याचे ठरविले. त्यांचा जन्म इ.स. १६८० मध्ये झाला होता. तब्बल ७२ वर्षांनंतर म्हणजे इ.स. १७५२ (शके १६७४) मधे तेहि एकादशीच्या पुण्यदिनी देहत्याग करण्याचे ठरविले. ती भाद्रपद महिन्यातील शुक्लपक्ष एकादशी होती. देहत्यागावेळी श्री प्रसन्नवेंकटदास संकीर्तने गात होते. त्यावेळी त्यांना बालरूपी कृष्णाचे दर्शन झाले होते. त्यावेळी त्यांचे एक मार्मिक गाणे केलेले आहे. त्याचा भावानुवाद खाली दिलेला आहे.

प्राणोत्क्रमण झाले तरीहि ते एकाच ठिकाणी बसून होते. गळ्यातील एकतारी तंबोरा व हातातील करताळा पडून न जाता जेथे असाव्यात तेथेच होत्या. काय सुखमय देहत्याग.

कोण तूं रे सोनुल्या कोण तूं रे छकुल्या ।। ध्रु ।।

कडी लावूनी सारी दारे बंद केली होती ।
कसा मग शिरलासी माझ्या घराती ।।
कोणती इच्छा ठेवूनी तूंझ्या मनांती ।
कसा काय आलासी रे माझ्या घराती ।।
सांग तूं रे चिमकुल्या ।। १ ।।

भाद्रपद मासाची शुक्ल पक्षाती ।
आजची एकदशीची तिथी ।।
पावसाळी आभाळी काळोखी राती ।
कसा काय आलासी रे माझ्या घराती ।।
सांग तूं रे चिमकुल्या ।। २ ।।

निद्रेच्या तंद्रीत मी असता धुंद ।
डोळ्याची उघड झाप चाललेली मंद मंद ।।
कसी झाली रे नजर माझी बंद ।
घरची दारे सारी असता बंद ।।
सांग तूं रे चिमकुल्या ।। ३ ।।

आधीचे तूंझे गोप रुप सोज्वळ ।
आतांचे स्वरुप फारच वेगळ ।।
आनंद प्रसन्नतेने फुललेल ।
कांती मय प्रकाशाने भरलेल ।।
खरे काय सांग तूं रे चिमकुल्या ।। ४ ।।

हे बाळ! हा नांही रे पोरखेळ ।
आज घडेल कांही तरी आगळ ।।
न शब्द न आवाज पडते कर्णी ।
तूं असणार इथे देवा अन्य न कोणी ।।
काय इच्छा तूंझी, सांग तूं रे चिमकुल्या ।। ५ ।।

आलासि कां रे करण्या माझे प्राण हरण ।
अर्पीत मी ते तूंज स्मरूनी तव चरण ।।
निर्धास्त ओढ माझे प्राण तत्क्षण ।
होईल तूंझी इच्छा पुरती पूर्ण ।।
हीच ना तूंझी इच्छा, सांग तूंरे चिमकुल्या ।। ६ ।।

वाटे माझे प्राण आहेस घेत खेचून ।
डोळे मिटले प्राण आहे जात ब्रम्हरंध्रातून ।।



प्रसन्नवेंकटरमणा, सुज्ञानी प्रवीण ।
केलेसी मज मुक्त संपवूनी भव तरण ।।
झाली ना दोघांची इच्छा पूर्ण ।
सांग तूं रे चिमकुल्या ।। ७ ।।

## पुण्यतिथी आराधना समारंभ

दासांच्या देहावसानानंतर श्री वेंकटेश्वराच्या वरदानात मिळालेली एकतारी तंबोरा, करताळा आणि भिक्षापात्र बागलकोट मधील त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक वर्षी भाद्रपद शुद्ध दशमी, द्वादशी आणि त्रयोदशीला आराधना महोत्सव अतिउत्साहाने साजरा केला जातो. खरी पुण्यतिथी एकादशीला आहे. परंतु माध्वसंप्रदायाप्रमाणे त्यादिवशी अन्नसंतर्पण नसते. नित्य देवपूजन व भजनसंकीर्तनाचे कार्यक्रम होत असतात. बदामी हे दासांचे दुसरे निवासस्थान होते. तेथेहि पुण्यतिथी साजरी केली जाते. कर्नाटकच्या इतर ठिकाणीहि विशेषत. मोठ्या शहरात पुण्यतिथी सोहळा आचरला जातो. आता याचा विस्तार भारतातील इतर प्रांतात तसेच परदेशातहि पसरत आहे. जेथे जेथे कन्नडीगांची वस्ती गणनीय आहे तेथे तेथे पुण्यतिथीचे आचरण केले जात आहे. याला कारण म्हणजे श्री प्रसन्नवेंकटदासांचे प्रभावी व्यक्तिमत्त्वच होय.

## उपसंहार

आता वेळ आली आहे श्री प्रसन्नवेंकटदासांच्या चरित्रात्मक निरुपणाची सांगता करण्याची. श्री दासांचे आशीर्वाद आणि त्यांच्या मार्फत श्री वेंकटेशाचे कृपादान म्हणून, विश्वस्त मंडळींनी हाती घेतलेल्या कामात देव आणि दासांनी मार्गदर्शन करावे अशी प्रार्थना त्यांच्या चरणी करुतो श्री प्रसन्नवेंकटदासांचे वंशज डाक्टर सुभाष काखंडकी यांच्या पत्नी कुं. सौ. रेखा काखंडकी यांनी रचलेल्या एक सुश्राव्य काव्यस्तवनाचा मराठी भावानुवाद उद्धृत करुन निरुपणाची समाप्ति करतो.

**स्तुतिस्तवन काव्य (कुसुमांजली)**

आहे पाहिले का कोणी श्री दासार्यांना ।
आहे भेटिले का कोणी श्री दास वर्याना ।।
धरी विश्वास स्वर्गीचे वैकुंठच अवतरले भूतळी ।
धरी पथ सप्तगिरीचा निवासले त्या स्थळी ।।
धरी दृढश्रद्धा तिरुपतीनाथ हा अनाथांचा नाथ ।
गुंतुनी मन त्याच्या स्मरणात ध्यानी करत चिंतना ।।
अशा प्रसन्नवेंकटेश कृपापात्र दृढविश्वासी
प्रसन्नवेंकटदासांना ।। १ ।।

जाणोनी पद्मनाभाचे पादपद्म शीघ्रगतिदायी ।
धरली अशी संकल्पना अंतरी हृदयी ठायी ठायी ।।
धरले मनी निरंतर साक्षात श्री वेंकटेशाच्या दर्शनाची ध्यास ।
प्राणार्पणाची निश्चयी आस दाविलेस सांगत ।।
निरर्थक जीवन विनादर्शना ।
अशा प्रसन्न वेंकटेश कृपापात्र ।
निश्चल निश्चयी प्रसन्न वेंकटदासांना ।। २ ।।

निवारले अक्षर अक्षरी प्रतिअक्षरी अज्ञान निरक्षरता ।
पाहिले अक्षयवंत म्हणूनी मन्मथापिता लक्ष्मीकांता ।।
कोरलेले जिव्हेवर बीजाक्षर जाहले नाम अंकित ।
बरसलेस लक्षलक्ष संख्यात हरिनामामृत धारेना ।।
अशा प्रसन्न वेंकटेश कृपापात्र ।
ब्रह्माक्षर ज्ञानी प्रसन्न वेंकटदासांना ।। ३ ।।



केलेस शब्दशब्दात प्रतिशब्दात ब्रह्मांड निर्माण ।
केलेस भागवतादि ग्रंथलेखन केलेस नारायण पंजर निरुपण ।।
गायलेस शब्दप्रतिशब्दात, करत स्मरण मुकुंदाचे गुणगान ।
अशा प्रसन्न वेंकटेश कृपापात्र अपरोक्ष ज्ञानी
प्रसन्नवेंकटदासांना ।। ४ ।।

प्रसन्न वेंकटनामाचे बल देईल तरुनी भवजल ।
दूर होती भवबंधनादि दोष सकळ ।।
भवबंध तोडवून, ठेवावे मन अचल ।
करावे हरिनामस्मरणसतत सर्वकाळ ।।
पोहोचवील मुक्तिधामासी हा मार्ग सरळ ।
श्री हरिदासाचे हे उपदेश, ज्ञानी मनी
रुतुनी घ्यावे अति खोल ।।
प्रतिनित्य स्मरावे अशा प्रसन्न वेंकटेश कृपा पात्र ।
प्रसन्न वेंकट दासाना ।। ५ ।।

**समाप्त**

**।। श्री कृष्णार्पणमस्तु ।।**

# श्री प्रसन्नवेंकटदासांची कीर्तने

## १

विठ्ठला, विठ्ठला धर माझ्या हाता ।
भक्तवत्सला विठ्ठला हे पंढरीनाथा ।। ध्रु ।।

पाहूनी पुंडलिकाची सेवावृत्ति ।
मातापित्यावरची श्रद्धाभक्ति ।
धावलासी वेगे पंढरिसी ।
झालासी इथलाचि रहिवासी, विठ्ठला, विठ्ठला ।।१।।

भक्ताना दिधल्या वचना करणी ।
तयांच्या भक्ति प्रेमी अडकुनी ।
काय गूढ तूझे सांग उलगडुनी, विठ्ठला विठ्ठला।।२।।

कधी न तू येणारा देववर ।
तूला अर्पिली दोन विटा सुंदर ।
युगे अठाविशी उभा तू तयावर ।
कर ठेवूनी कटावर, विठ्ठला विठ्ठला ।। ३ ।।

वेद आणीलासी होऊनि जलचर ।
मंदार वाहिलेसी पाठीवर ।
धरणी धरिलेसी दांतावर
बाळा तारिलेसी उंबरठ्यावर, विठ्ठला, विठ्ठला ।।४।।

घातलेस राजास पाताळासी ।
निक्षत्रिय पृथ्वि केलेसी ।



सुराज्य स्थापन केलेसी ।
गोप पुत्र म्हणूनी अवतरलासी, विठ्ठला, विठ्ठला ।।५।।

स्त्री वृत वैकल्ये मोडिलासी ।
पुढे कल्कि होऊन येशी ।
म्लेंछाचे मर्दन करसी ।
कसे काय वर्णू तूझ्या गूढ कृत्तिशी ।
प्रसन्न वेंकट कृष्णा, विठ्ठला, विठ्ठला ।। ६ ।।

## २

गमते मन देई मज रक्षण ।
पिता उडुपिचा जाणता कृष्ण ।
मंदहास्य शोभविते इंदुवदन ।
श्री-भू देवी वर नारायण ।। ध्रु ।।

समुद्राच्या खळखळ लाटा लहरी ।
सहज फेकी तटाकी दूरवरी ।
दास पुरंदराचा राजा श्री हरि ।
रविची काटी धरी भुजावरी ।। १ ।।

देवकि जठरी झाले त्याचे जनन ।
गोकुळ केला त्याने वासस्थान
मातुल कंसाचे केलेहनन ।
बोटे केले गोवर्धन धारण ।। २ ।।

पूर्ण प्रज्ञासी द्वारकात भेटला ।
गोपी चंदनातुनी उडपीत आला ।

अखिल भवार्णवाचा मूळाधारा ।
प्रसन्नवेंकटदेवा, जगदोद्धारा ।। ३ ।।

### ३

कर पालना, माधवा, कर करुणा ।। ध्रु ।।

तुझांच महिमा जे नाचत गाती ।
अश्या संतांची दे मज संगती ।
ऐकू द्यावे मजला तव गुणगाना ।
कर पालना, माधवा, कर करुणा ।। १ ।।

लाजवू नको मज करुनी नीचा अधीन ।
ग्वाही, मी सदाचारवृत्ति आचरीन।
सतत, करीन मी तूंझीच चिंतना ।
करपालना, माधवा कर करुणा ।। २ ।।

जरी घडविसी मजला तूझा विसर ।
नाचव तूझे नाम माझ्या जिव्हेवर ।
प्रसन्नवेंकट-मनोहर कृष्णा ।
कर पालना, माधवा, कर करुणा ।। ३ ।।

### ४

पावना वेंकटरमणा दयानिधी नारायणा ।। ध्रु ।।

मस्तकी मोती, रत्न हिरे जडित मुकुट ।
कस्तुरी तिलक शोभावि तुझे ललाट ।।
तळपती कर्णकुंडले प्रकाशीत झगझगाट ।
दिसे कांतीमय तुझे सुंदर मुखवट ।। १ ।।



रत्न मोत्याचे हार वन - वैजयंती माळा ।
कौस्तुभ अन्य आभरणे अलंकृती तूंझी गळा ।
चक्र शंख दिसती स्पष्ट तुझ्या दोन्ही करी ।
चतुर्भुजी घातलेली अमूल्य कंकणे भारी ।। २ ।।

नेसलासी खोवूनी अति घट्ट पितांबर ।
अरिसंहारक तू रणधीर शूर-वीर ।।
चरणी वज्राचे नुपूर, भिडते तेथे मंदार ।
निवाससी भक्तांसाठी सप्त गिरीवर ।। ३ ।।

अगर चंदन कर्पूर केशर लेपन सुगंधीत अंग ।
जाई जुई चाफ्याची फुले घमघमविती अंगांग ।
प्रसन्न वेंकटरमणा कृष्णा तूचि श्रीरंग ।
दया कर देवा कर माझे भव भंग ।। ४ ।।

### ५

विसरू नको रे मना, माझ्या प्रीतिच्या माधवा ।।
दारिद्र्य दुःख दूरुनी जो जीवा देई विसावा ।। ध्रु ।।

पाहूनी योग्यता स्वीकारी भक्ति, हा त्रैलाक्य धनी ।
भरी उत्साह जीवास या कठोर संसार जीवनी ।।
चुकती चाल बोल देई दयेने सुधारवुनी ।
देई वरदान तत्पर करुणा पसरवुली ।। १ ।।

कोणी असो अज्ञानी अथवा महाज्ञानी ।
सेवक करी तयांना रमती जे त्याच्या गुणगानी ।

श्री हरिस सोडूनी अन्य देव देवता पूजुनी ।
काय मागती घेती दुर्बळ आपुल्या जीवनी ।। २ ।।

आंताच विचारा तुमच्या गुरुवर्याना ।
जयांना आहे लाभली हरि करुणा ।
काय कोणी तरले आहे कां भवसागर ।
श्री हरि सोडूनी पूजुनी अन्य दैवते इहपर ।। ३ ।।

स्मरा, विश्वास धरा प्रसन्न वेंकटमाधवा वरी
श्रद्धा भक्तिने पडूनी त्याच्या पावन चरणावरी ।।४।।

६

श्री हरिच माझा आश्रय दायक नि गति दायक ।
न च कोणी मजला दुसरे अन्य सहाय्यक ।। ध्रु ।।

विसरलो साऱ्या गत आपत्तीना ।
मोह माया पाशात अडकलो पुन्हा ।।
गत आपत्ती सगळे आता एकवटले ।
पुढे काय माझे याचे भानच नुरले ।। १ ।।

रात्र गेली निद्री, विश्रांती रति क्रीडेत ।
दिवस गेला खाण्यापिणी ऐषआरामी मजेत ।
इकडे तिकडे भटकुनी काळ उगाच गेला ।
आता कुणी तुजवीण स्वामी!
यम पाश येऊनी थडकला ।। २ ।।

अज्ञानाचा साप चावुनी तव
पद्म पादाचे विस्मरण झाले ।



सत्ज्ञानाच्या उणीवेने मजला अति दु:खी केले ।
प्रसन्नवेंकटेशा माझे तापत्रय सारे निवार अति दूर
विश्वव्यापका देवा मला यम पाशेतून रक्षण कर ।३।

७

काय चूक ती माझी दिसली रे तुजला ।
दयाघना सांगा तू ते आंता मजला ।। ध्रु ।।

एका नामस्मरणी काही ना लाभले गति इहपर ।
अन्यकोणी एका सद्गुणी तरले भवसागर ।।
मंदमति हि तुझ्या भजनाने केली त्यांची पापेदूर ।
अनंत महिमेचा ब्रम्हांड नायका, दयाघना ।। १ ।।

फिरता वारा चोहीकडे तुझ्या भोवती ।
सुकृतीचे देइ पुण्य फळ भक्ताला एकांती ।
यम आणि त्यांचे दूत दूर राहती ठेवूनी अंतराती ।
इंदिरा आराधित देवा दयाघना ।। २ ।।

अपराधानुसार असावी सौम्य वा कठिण शिक्षा ।
शिशु अपराधीला असावी नेत्र भयाची शिक्षा ।
प्राणहंतकाना, घोर अपराधीना द्यावी मरणाची शिक्षा।
माझी चूक असेल तर क्षमा कर
नको देवू भवभोग शिक्षा ।
प्रसन्न वेंकटा भक्त वत्सला, दयाघना ।। ३ ।।

## ८

दया कर रंगा दयाकर विठ्ठला
आता विलंब, आलस्य ते कशाला ।। ध्रु ।।

दोषित मी सर्वात अति श्रेष्ट ।
निर्दोषित तूं राजा सर्वात ज्येष्ठ ।
जाई बुडुनी मी घोर या भव संसारी ।
अवलोकनाहूनी तू सदा राहसी बाहेरी, रंगा ।। १ ।।

न जाणे मी भक्ति तिळमात्रहि ।
भक्ति प्रिय देव तू शेषशाई ।
नव नव विषयी मी सतत मग्न मनी ।
भवबंधन माझे दे मजला सोडवुनी, रंगा ।। २ ।।

आप्तवर्ग माझे सारे स्वार्थी ।
न कोणी मजला आपत्तीत पाहती ।
पामर मी एक मानव धर्माचरणी ।
श्रमवू नको मजला आपत्तीनी, रंगा ।। ३ ।।

निशिदिनी धावे मी पोट पाण्यासाठी ।
त्यासाठी बोले मी निरंतर खोट्या गोष्टी ।
प्रतिक्षणी मी करी शत अपराध ।
क्षमाकर माझे अपराध दे अभय, रंगा ।। ४ ।।

सापडलो मी घाण अशा संसार राडीत ।
काढ मजला बाहेर सुरक्षित, प्रसन्नवेंकट रंगा ।।५।।



## ९

सतत कल्याण नित्य सुमंगल
अच्युताच्या प्रिय दासवर्यांना
रति पति पादपद्मी सदा रत
अशा महा माहात्म्यांना ।। ध्रु ।।

आधिव्याधि नाही जयाती ।
अशुभवार्ता ज्यांच्या कानी न पडती ।।
क्रोध मत्सर गुण नाही तयाती ।
न कधी दाखविती त्यांची दृष्टमति।
खेद मोद जयाना न शिवति ।
श्रीपति स जे नवविध भक्तिंनी पुजिली
अशा सद्भक्तांना, सततकल्याण नित्य सुमंगल ।। १ ।।

शत्रु जयास होती सख्ये आप्तबंधु मित्र ।
विष पेला जे मानती अमृत भरित पात्र ।
सर्पचि जयाना होती पुष्प हार ।
उष्ण शीत बाधेची तयाना न कदर ।
वन अरण्ये जे समजती स्थान अभय ।
शस्त्र घात-पात समयी राहती निर्भय ।
सातत्याने जे करती नरहरि स्मरण नित्य ।
अश्या महान सद्भक्ताना, सतत
कल्याण नित्य सुमंगल ।। २ ।।

पाप ताप आपत्तिहूनी जे राहती दूर ।
राग अनुरागापासून जे राखती अंतर ।
प्रसन्न वेंकटेशा भजनी जे रमती निरंतर
अश्या सद्गुणी दास वर्यांना,
सतत कल्याण नित्यसुमंगल

## १०

असे असेल तर किती किती छान ।
लाभेल जीवनी सुख समाधान
असावी अशी प्रिय सति सखी सहचरिणी ।
पतीस द्यावे साथ सहकार सतत धर्माचरणी ।। ध्रु ।।

पुत्र असावा सुचरितेचा सद्गुणी अलौकिक।।
सत्कार्यी मग्न, सुज्ञानी सुशास्त्राचा अभ्यासूक ।।१।।

धन असेल तर द्यावे सज्जन सत्पात्रीला दान ।।
घर असेल तर व्हावे मध्यान्ही अतिथि भोजन ।।२।।

दांभिक पणा सोडून धरावी मनी निश्चल भक्ति ।।
भवपाश दूर करणारी असावी वृत्ति विरक्ति ।। ३ ।।

दुष्कृती त्यजलेली असावी अशी धृति ।
मति पाहिजे ती असावी शुद्ध मति, न च कुमति ।। ४ ।।

अविवेकीची सोडून मैत्री असावी संताच्या संगतीत ।
जीवन चालवावे नित्य प्रसन्न वेंकटाचे
प्रसाद स्वीकरत ।। ५ ।।



नाना योनीतुनी आलो मी फिरफिरुनी
गेलो त्रासुनी आणि पूर्णपणे होरपळूनी ।।
प्रसन्न वेंकटा मुक्त करा मजला साऱ्या दुराशातुनी ।। ६ ।।

## ११

वाऱ्यातला दिवा असे मनुष्य शरीर ।
नळ हरिश्चंद्रा सारखे पुण्य जीवी
आहेत का धरतीवर ।। ध्रु ।।

दुराशा दूराहंकार मानवांची सारे भोग सुख
त्यावर पाळत ठेवी देव श्री अंबुजाक्ष ।। १ ।।

धर्म सत्कर्मा-चरणी जे न घालती लक्ष ।
त्यांना करी प्रसन्न वेंकटेश सदा अलक्ष्य ।। २ ।।

## १२

रक्ष रे गोविंदा रक्षरे मुकुंदा
भवबंध तोडव तूं नित्यानंदा ।। ध्रु ।।

नाना योनीतुनी आलो फिरुनी ।
थकलो मी प्रदक्षिणा श्रमातुनी ।
तूझ्या कृपने लाभला मानव जन्म ।
तरी न आचरीला धर्म न केले सत्कर्म ।
ज्ञानापासून राहिलो वंचित झाली फसगत ।
पुढे काय माझी स्थिती गति, सच्चिदानंदा।१।

वानरला जसा सोन्याचा हंडा कुचकामी।
आयुष्य गेले मूर्खपणीने माझे निष्कामी ।
हे ठरेल का मजला नरकाचे साधन? ।
पुण्यसंपर्क विना चालविले मी जीवन ।
दे रक्षण मजला दयाळू राजा गोविंदा ।। २ ।।

अपराध माझे मिळू द्यावे तुझ्या दया सागरी ।
नाही सापडे अन्य मार्ग कुठला माझ्या विचारी ।
पिता, तूं माझा प्रसन्नवेंकटेशा मुकुंदा ।। ३ ।।

## १३

अगाध महिमा वाही श्री हरिचे अप्रतीम नाम ।
जपानुष्टान करी नित्य या नामाचे चतुर्मुख ब्रम्ह । धु ।

पापाच्या कोटी कोटी राशी जळुनी होती भस्म ।
पुढे न येति आपत्ति तेथेचि राहती होती खत्म ।।१।।

मंदमतियांचा सगळा अज्ञानाचा अंधार ।
निवारी श्री हरिचे बालार्करुपी येऊनी अंकुर ।। २ ।।

दुरीताचे मूळच काढी निपटुनी असा तो अंकुर ।
साधकाची श्रद्धा भक्ति वाढवत ठेवी निरंतर ।। ३ ।।

निष्कलंक दास वर्याना आदि अंती गतिदायक ।
श्रद्धाळु भक्त वर्गाला राहि सदा अभयदायक ।। ४ ।।

उघडे ठेवी सदैव तयांना मुक्तिधामाचे दार ।
सज्ञनाच्या प्रवेशाला नाहीच तेथे काही अभ्यंतर ।।५।।



सर्वश्रुत शास्त्र पुराणोक्त ऋषिमुनिहुनी उक्त ।
भूमिवरच्या विश्वासूना घेई त्यांच्या पदरात ।। ६ ।।

सर्वज्ञानाचार्यांच्या जिव्हेवर असते सतत लोळत ।
सर्वेश प्रसन्न वेंकटेश श्री हरिचे नाम अमृतभरीत।।७।।

## १४

रमवी नयना श्री कृष्ण लीला ।
तया अमर कृतींना नच तुलना ।। ध्रु ।।

आला योग्य वेळी भूतळी गोकुळी
वाढले, नंद यशोदेच्या घरकुली
दिले संतान भाग्य त्या जोडपीना
सुखविले साऱ्या गोकुळी जना ।। १ ।।

चोरुनी चोरवुनी दहि दूधलोणी ।
गोप गोपीकेना लुबाडुनी ।
सर्व बालमित्राना फसवुनी
एकटाच खाई, श्यामवर्णीसुहास्य वदनी।। २ ।।

चालवी विश्व एका कटाक्षी ।
बांधवुनी घेतले विशालाक्षी ।
एकाग्रतेने पाहू विभु प्रभुला ।
प्रसन्न वेंकटेशाला, गाऊ गुणगानाला ।।३।।

## १५

हत्ती आला आई महा हत्ती आला ।
मदमस्तीचा आई पहा हत्ती आला ।
दानवकुल हंतक आई हत्ती आला ।
हत्ती आला आई महा हत्ती आला ।। १ ।।

श्रृंगार वदनाचा धारक मंगल तिलकाचा ।
कुरळ केशाचा धुम्रवर्णीचा ।
व्याघ्र नखाचा शूर्प कर्णीचा ।
श्री रंग नावाचा आई हत्ती आला ।। २ ।।

गोकुळी नरनारीना भुलवणारा हत्ती ।
पायी श्रृंखलाचा घुळघुळ नाद उठविणारा हत्ती ।
कमळा जवळी सरोवरी फिरणारा हत्ती ।।
सुजन हितैषी कृपाकटाक्षी भक्ताना पोषणारा हत्ती ।
प्रसन्नवेंकटेश नामधारक बलवान हत्ती आला ।।३।।

## १६

येगे माझी आई । येगे येगे रंगूबाई ।।
येगे येगे माझी ताई । येग येगे रंगूमाई ।।
मला दे मातृमाया । तूं येगे माझी आई ।। ध्रु ।।

येरे येरे माझ्या बापा । न दाखवू मुलांवरी कोपा ।
येरे येरे माझ्या अप्पा । त्रिजगतीचा तूरे बापा ।।
मलापुरव पितृछाया । तूं रे माझ्या बापा ।। १ ।।



येरे येरे माझ्या आण्णा । तूं सर्वाना मोठा आण्णा ।।
येरे माझा छोटा भय्या । येरे माझ्या धाकुल्या ।।
द्यावे मला बंधुप्रेम । तुम्हीरे माझे भाऊ आण्णा ।।
येरे येरे नंद नंदा । येरे येरे सच्चिदानंदा ।।
येरे येरे देव गोविंदा । येरे येरे बालमुकुंदा ।।
द्यावे मलापूर्णानंदा । तू येरे करुणानंदा ।। २ ।।

येरे येरे तू खेळत । येरे तूं ठुमकत ।
येरे तू आत नाचत । येरे भावुकाना प्रसन्नहोत ।
देवादिदेवा प्रसन्नवेंकटेश जगन्नाथ।। ३ ।।

## १७

मन ठेव निश्चल होऊं न दे चंचल ।
नको करू आत्मवंचन श्री हरिस कर आत्मसमर्पण।।ध्रु।।

विश्वासले तूं जे जन, तुला गेले दूर ते सोडून ।
निधीसंचित संपद ठेवण नासूनी, घडे विस्मरण ।। १ ।।

अल्पमतीच्या उपदेशाला नको जाऊ तू भुलून ।
जाणुनी, क्षणहि जातो घसरून शेषशाईस जा शरण ।।२।।

नको करूनी घेऊ श्रम नकोच करू अन्य प्रयत्न ।
श्री प्रसन्नवेंकटशाला घे करूनी प्रसन्न ।
हे न करशी तर श्री मध्व गुरूची तूजला आण ।।३।।

## १८

घडू दे मजला सत्संग । साधू संतांचा सुसंग ।।
होऊ दे हा जड देह भंग । करील ते असा सत्संग ।।ध्रु ।।

श्री हरिच्या पादांबुजी । रमती जे होवूनी भृंग ।।
मधुपादरजसेवनी दंग । अशा ज्ञानी भागवताचा संग ।।१।।

जे मानती त्रैलोक्य गुरु । सर्वतंत्रस्वतंत्र श्री मध्वाना ।
पुजिती तयाना तंत्र सारोक्त, अष्टमहामंत्रयुक्त ।।
अनसरूनी स्नेह रूपी यंत्र । अश्या सज्ञन जनाचा संग
।। २ ।।

पंचसंस्कार पंचभेदतत्व प्रमाण मानून । जे आराधती प्रसन्न
वेंकटेशाला । अश्या आराधकांचा संग ।। ३ ।।

## १९

अरेमानवा ! संत राहती भवापासून दूर
जाण, संतांची सेवा । खरीच ती श्रीहरिची सेवा ।।ध्रु।।

संतांचे विचार मत । ते च श्री हरिचे अभिमत ।
संताचे विचार मति । देईल मुक्ति प्राप्ती ।।
संतांचे पावन पाद । देईल चिंतकाला आल्हाद ।।
संतांचे दृढ देहगात्र । करील भुवनचि पवित्र ।। १ ।।

संताचे सुतेज दिव्य दृष्टि । जाळील पापे कोटी कोटी ।
संताचे वचन प्रवचन । करते धर्माचे निरूपण ।।
संताचा सुसंग ऊठवी । मनी भक्ति तरंग ।।



संताला जो जो भेटी । तो तो ऐकेल शुभगोष्टी ।।२।।

संत देती जयाना अभय । सदैव राहती ते निर्भय ।।
संताचे भेदावलोकन । करीलपूर्ण वंशविच्छेदन ।।
संतजयाना दाविती प्रीति । तयांना होई सुखप्राप्ती ।
संताचे विचार मंथन । ठरेल पुरुषार्थासि कारण ।।३।।

संताचा महा महिमा । वाढवी परमेशावरी प्रेमा ।
संत राहती ते नगर । भक्ताला वाटे ते माहेर ।।
संताचे सारे गोत्र वशंज । गति भाग्य देति मज ।
साधुसंतांचे पाद दर्शन ।
करु देईल प्रसन्नवेंकटेशासी प्रसन्न।। ४ ।।

## २०

दयवंत किती किती देवा ।
देवादि देवा तू श्री लक्ष्मी कांता ।।
भक्त जन असता संकटात ।
देशी तयांसी सहकार साथ ।। ध्रु ।।

पूर्व जन्मीचा तो एक राजा ।
पुनर्जन्मी जन्मला होवूनी गजा ।।
सापडला होता आपत्तीत ।
अडकवूनी पाय मगर मुखात ।।
धावलासी हरि तुज नामस्मरता ।
करूनी गजाची मुक्तता धाडिलेस स्वर्गात ।। १ ।।

त्रिशूळ धराला भुलवूनी फसवुनी
असूराने घेतले होते वरदान मागुनी
वरदानाने असूर झाला होत मस्त
केले होते त्रिशूळधराला त्रस्त
सुंदर युवतीच्या रुपी येऊनी
केले असूरासी भस्म, नाच नाचवुनी ।। २ ।।

पांडवाने पण दिल्या कारणी ।
कौरवानी खेचले द्रोपदीस सभांगणी ।।
लुटू पाहिले तिचा अभिमान विवस्त्र करुनी ।
प्रसन्नवेंकटा तुज हाक मारिता कर ऊंचावुनी ।
राखिलेस अभिमान असंख्य वस्त्रे पुरवुनी ।। ३ ।।

## २१

असे कोणाचे हे लबाड पोर ।
असेल कांते नवनीत चोर ।।
अथवा गोपी नारीचा जार ।
मनी का येई असा विचार ।। ध्रु ।।

रात्री निद्रेस असता मी जात ।
शब्द न करता हळुच येई आंत ।।
ध्वज पताका धरुनी हाती।
करी माझी अति फजिती ।। १ ।।

चोळी सोडवुनी करी स्तन मर्दन।
गालस्पर्शुनी देई गोड चुंबन ।।



सासू सासऱ्या पुढे करी नग्न ।
घेता अुचलुनी त्यासी बालक म्हणून ।। २ ।।

अडकले मी मोहपाशी मोहक बालक बघून ।
वाटे भीति, वेणी सोडविता गळा धरुन ।।
शृंगाराचा खेळ आंरभिता ।
प्रसन्न वेंकटकृष्ण हस हस हसता ।। ३ ।।

## २२

स्पर्शसी श्री हरि तुझ्या कराने जी पाषाण
तो होई अति दिव्य रत्न मौल्यवान ।। ध्रु ।।

अधर्मी! जो, होई आडवा न करी तुझी पूजा ।
तुझ्या कृपेचा होई ब्रम्ह रामसेवक कपिराजा ।।१।।

पार्थास मिळवुनी दिली रणक्षेत्रात जीत ।
तुझ्या अवकृपेने कौरव झाले पराजित ।। २ ।।

हरि! तुझ्या कृपेचे शिशुहि होते मान्यवर
जया न मिळे तुझी प्रीति, ते क्षुल्लक भूमिवर ।।३।।

गुणगान करिती जे तुझे भक्त ते श्रेष्ट ।
जे न स्मरति तुजला ते राहति निकृष्ट ।। ४ ।।

श्री हरि तुझा महिमा घनतर घनतम अुंच ।
प्रसन्नवेंकटा नको ठेवू मजला नीच ।। ५ ।।

## २३

हे मना का बाळगसी तू भय भीति ।
श्रीनाथ जगन्नाथ असता अवती भवती ।। ध्रु ।।

जननी जठरी नवमासी कोण केले पोषण ।
जन्मताच जननी स्तनी कसे झाले पय निर्माण ।
कोण घडवी निद्रा जागृति आदि चलन वलन ।
न आदि न अंती असा प्रभू असता
तुजपाशी प्रति क्षण ।। १ ।।

नच मोठेपण, तरी आत्मा जन्मी विप्रकुली ।
कसे मिळते त्यासी पूर्णप्रज्ञ सत्सिद्धांती साऊली ।
अप्रबुद्धांना कोण बोधविती धर्मशास्त्र वचन ।
तुझ्या पुत्र मुख्यप्राणाविना दुसरे कोण ।। २ ।।

अरण्य वासीयांचे, पशु पक्ष्यांचे कसे होते पालन ।
कसा येतो पाऊस पिकवितो वृक्ष धान्य अन्न ।
सारे हे करतो करुणामयी प्रसन्न वेंकटकृष्ण ।
जा तयासी शरण, होवू न दे तयाचे विस्मरण ।।३।।

## २४

फिरत आहे कोणी वाड्या समोरी ।
फिरत आहे कोणी वरच्या माडीवरी ।। ध्रु ।।

थळथळ प्रकाश फेकत सुतेज धारी
चल ग गडे पाहू तयास झडकरी



माणिक मोति सुवर्ण रत्नाभरणे फेकत
आहे का येत श्रृंगारवदमी वनजाक्षीसह, मंदस्मित।१।

सूरसमूह ऋषिमुनि समूह समवेत
सुरताळ वाद्याच्या सुघोष गजरी, मिरवित
पेरीले हृदयी प्रेमांकूर आता कां राहसी मजहूनि दूर
प्रसन्नवेंकटा, स्वयंप्रकाशीत तारा ये ना सत्वर ।।२।।

## २५

श्री यमराज आदेशति आपुल्या दूतांना ।
श्री धर्मराज सांगति आपुल्या आत्मीयाना ।। ध्रु ।।

हाती धरुनी एक न्यायदाती तराजू ।
मापती पाप पुण्य राशी एक एक बाजू ।।
करती पापपुण्य राशीचा वाटा तोलूनतोलून ।
निर्देशति कसे कोठे आणावे सुजना दुर्जना ।। १ ।।

श्री हरिभक्त परायण नर नारीना ।
जे निंदति करूनी त्यांची अवहेलना ।।
हरिदासांची सद्गुण न पारखता ।
जे अपशब्द बोलती त्यांना पाहता ।।
बांधुनी आणावे यमलोकाला अश्या दुरात्म्याना ।।२।।

हरिनामामृत, अन्य पुण्य कथा जे न ऐकति ।
आपुल्या स्त्रींच्या वशात जे सतत राहती।।
गुरु इतरे श्रेष्ट जनाना प्रत्युत्तर देति ।

परनारींच्या कडे ज्यांची विषयासक्ति ।।
खेचूनी आणावे यमलोकाला अश्या दुष्ट जनाना ।।३।।

डांभीकपणे जे करती अंबुजाक्षाची पुजा ।
राहूनी स्त्रींच्या संगतीत करीत मौज मजा ।।
परद्रव्य अपहरणी ज्यांचे निरंतर चिंतन ।
परपीडणी जे मानती सारे सुखसमाधान ।।
बांधुनी मुस्कट आणावे यमलोकाला
अश्या डांभीकाना ।।४ ।।

आचरणी जयांची सुशील वृत्ती ।
देव, देवभक्तावरी, गुरुवरी ज्यांची प्रीति ।।
परोपकार करणी ज्यांची आसक्ति ।
प्रसन्नवेंकटावरी ज्याची निर्मल भक्ति ।।
आदराने आणावे, आणि द्यावे विष्णुदूतांना ।
घेऊनि जाण्या वैंकुठाला, अश्या सुजनाना ।। ५ ।।

## २६

रामा श्री रामा, सीतारामा ।
रघूरामा, जयरामा ।
अगाध महिमा असे तूंझ्या ।
दिव्य विमल शुभ नामा ।। ध्रु ।।

श्री रामापादांबुजाचे सतत सेवन ।
करी देह पूर्ण परम पावन ।
रघूकुलसद्वंश भूषण, मनमोहक श्यामल वर्ण ।।



सुंदर सुस्मित वदन, कमल दल
युत तेजस्वी नयन, रामा ।। १ ।।

दंडकुखर त्रिपुरअरि हराहूनी वंदीत ।
जटाधारी ऋषिमुनीहूनी अर्चित ।
पवनात्मज, बिभिषणाहूनि सेविल ।
पाद स्पर्शाने अहिल्येस पावन कृत, रामा ।। २ ।।

दंशकंठ प्राण हारक, वालीमारक ।
असूर, खल निशाचरविनाशक ।
पितृआज्ञापालक, सुराज्य स्थापक ।
कोदंडधारी प्रसन्नवेंकटा अभिरामा, रामा

## २७

रंगा! आहे कां वाचले कोणी?
या घोर भव अरण्यी शिरूनी ।
कसा मी आंता येऊ बाहेर पडूनी ।
या घनदाट भव अरण्यातुनी ।। ध्रु ।।

आठ बाजूला आठ मोठे हत्ती ।
सतत पाहरा करत राहती ।।
बसलेले तीन कोल्हे मध्यातीं ।
राहूनी एकमेकाच्या संगति ।।
मोकाट वाऱ्याने झाडे पडून जाती ।
राही निराधार येथे करूनी वसति ।।

सिंह वाघाच्या डरकाळ्या जोर ऐकू येती ।
दोन लबाड लांडगे भांडूनी हातावर येती ।। १ ।।

तयात फिरत असतो एक अस्वल भयंकर ।
माकड चेष्टा करत बसतो स्नेही वानर ।।
पाण्याच्या डबक्यात लपलेला मोठा मगर ।
तेथेच पहुडलेला एक लांब अजगर ।।
विंचू, इंगळे अनेक साप चढती अंगावर ।
शब्दन येती बोलण्यास माझ्या जीव्हेवर ।।
प्रसन्नवेंकटा घे बोलावुनी सारा परिवार ।
येऊ दे मला अरण्यातुनी सत्वर बाहेर ।। २ ।।

## २८

प्रल्हादाच्या भीति रुपी हत्तीला ।
स्तंभ फोडूनी बाहेर आला परम सिंह ।।
राज्य पद बहाल करूनी भक्ताला ।
प्रल्हादालातारिला देव नरसिंह ।। ध्रु ।।

नरसिंहाने हिरण्य कश्यपाचा उदर फाडिला ।
बाहेर आलेल्या रक्ताचे सेवन केला ।।
पोटातील आतडे बाहेर काढला ।
त्यांची माळ करूनी गळ्यात घातला ।। १ ।।

जन्माने प्रल्हादाचा दुष्टराक्षस कुळ ।
सहन केले पित्याचे अतोनात छळ ।।
हरिभजन विना व्यर्थ न केली वेळ ।
नाम स्मरणांत प्रल्हाद दंगला सर्व काळ ।। २ ।।



दुष्ट असूर हिरण्यकश्यपाचा अंत पाहूनी ।
पुष्पवृष्टि झाली आकाशातील तिन्ही लोकातूनी ।।
प्रल्हादाची निः सीम निष्टातयासी कारण ।
कमलाक्ष नृसिंहाने हाक ऐकूनी केले त्यांचे तारण ।३।

फिरूनी आलो नाना योनि, गेलो होरपळुनी ।
नलिनाक्षा न झाली जाणीव तूंझी माझ्या मनी ।
कर उद्धार माझा, भव दुरुनी, प्रसन्नवेंकट नृसिंह ।४।

## २९

योग म्हणजे काय? कशास म्हणावे योग ।
कशी करावी योग साधना, कशी धरावी योग धारणा ।
जाणावे कोठे होते योग-महायोग ।। ध्रु ।।

शेषशाईचे एकाग्रतेने जेथे होते नामस्मरण ।
त्याच्या कीर्तिचे गुणगान अखंड नामसंकीर्तन ।
तेथे घडत असते योगाचरण,
मग होतो योग-महायोग ।। १ ।।

भोंदू जनांच्या नादी न लगता
योगासनेच्या जाळी न पडता ।
सुहास्यवदनी नारीवरी दृष्टि न टाकता ।
श्री हरिदास होऊनि, ध्यानी मग्न राहता ।
जी घडती अवस्था, तेचि योगाचरण,
मग होतो योग-महायोग ।। २ ।।

वाक् इंद्रियेस न बांधता ।
कुंभक म्हणूनी श्वसनक्रीयेचे उघडझाप न करता ।
परद्रव्यापहराणाची परनारीचा ध्यास न धरता,
सुखोभोगाची आस न करता ।।
संतृप्त जीवनांत, घडते योगा चरण,
मग होतो योग महायोग ।। ३ ।।

## ३०

भूवरि धुळीत लोळले तरी काय ।
दीड दंडवत घातले तरी काय ।।
देह दंडविले तरी काय ।
कठीण व्रतवैकल्ये आचरली तरी काय ।।
कुच कामी सगळे हे मार्ग उपाय ।
जर नसे श्री हरिवरि भक्ति आणि
त्याच्या दये शिवाय ।। ध्रु ।।

पंच पुण्य सरोवरी स्नान केले तरी काय ।
श्वसन क्रीयेची उघड झाप केले तरी काय ।।
परिश्रमाने अरण्यी उभे राहूनी
तप केले तरी काय ।
मेहुणा अर्जुनाच्या सारथिचे पाद
पुजन केल्या शिवाय ।। १ ।।

पर्ण कंदमुळे खाऊनि सारी पापे दूर होतील काय।
उपवासी वारा खाऊनी राहीले तरी काय ।।



धरतीवरी सतत प्रदक्षिणा घातल्या तरी काय ।
कंदर्पशयनाचे बळ मिळविल्या शिवाय ।। २ ।।

मध्व सरोवरी स्नान विना, जन्माचे सार्थक काय ।
लाडक्या कृष्णास न पाहती अश्या
डोळ्यांचा उपयोग काय ।।
मध्वेश प्रसन्न वेंकटेशाप्रति ज्यांची न भक्ति प्रीति ।
अश्याचे जगती जगण्याचे प्रयोजन काय ।। ३ ।।

देव प्रसन्नवेंकटेशाचे पादांबुज सेवन
भक्तांना देई योगसाधन
हाच होई योग महोयोग ।। ४ ।।

## ३१

**श्री गोपाल दासांचे श्री प्रसन्नवेंकटदासावर केलेले स्तुति कीर्तन ***

झाला आनंदी आनंद आनंद मला ।
महानंद आनंद आनंद झाला ।। ध्रु ।।

बागलकोटास भेट देऊनी ।
आलो परतुनी धन्यहोऊनी ।।
जाणिले ऐकूनी पाहुनी अनुभवुनी ।
प्रसन्न वेंकटाच्या परमानंदाला ।। १ ।।

प्रसन्न वेंकटदास श्री वेंकटेशाचे किंकर ।
भक्ति सेवा केली देवांची राहूनी तत्पर ।।
स्मरले दासचरण केला नमस्कार लवुनी शीर ।
दाखविला दासाना माझा स्नेहपूर्ण आदर ।। २ ।।

पुजियले श्री हनुमंतास दिन प्रति दिन ।
संपादिले भक्ति वैराग्य झाले घन संपन्न ।।
संपविले मध्व सिद्धांत मताचे गाढ अध्ययन ।
समजले गेले दासचि ज्ञान ध्यानाचे माहेर म्हणून ।।३।।

घेतले साकल्य, सारुप्य सायुज्याचे सतत सुख ।
उपभोगिले श्रवणादि नवविध भक्तिचे सौख्य ।।
झाले समकालीना मध्ये ते चि दास जेष्ट ।
मिरविले होऊनी लोकमान्य आणि दास श्रेष्ट ।। ४ ।।

बागलकोट भाग्य नगरी वसलेली घटप्रभे तीरी ।
सत्य श्री गोपाल विठ्ठलाच्या नाम गजरी ।।
टाळ मृदंग नादी, तंबोरा वीणेच्या सुस्वरी ।
टाकलेली दुंदुभुनी सर्व प्रदेशी आणि नगरी ।। ५ ।।

*(याची मूळ कानडी कृती नुकतीच श्रीलक्ष्मीकांत पाटील, विजापूर यांनी संशोधीत केलेली आहे)

## आधार ग्रंथांची सूची

१. 'श्री प्रसन्नवेंकटदासची कीर्तने' समग्र दाससाहित्य संपुट ८, संपादक टी.के. इंदुबाई, पब्लिशर कर्नाटक सरकार, कन्नड आणि संस्कृती निर्देशालय, बेंगळूर.

२. 'प्रसन्नवेंकटदासर पदे (जनप्रिय देवांची नाम कीर्तने)' संग्रहकार चिदंबर श्री पादराव कुळकर्णी सरस्वती प्रकाशन, बेळगाव.

३. वेबसाइट -WWW.prasannaventadasaru.org